cmyk

## संपादकीय

### नागरिकत्व सिद्ध करणे कठीण

आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार कार्ड नागरिकत्वाचे पुरावे नाहीत असा महत्त्वपूर्ण निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. आधार, पॅन आणि मतदार कार्ड ही कागदपत्रे सरकारने वैध कागदपत्रे तपासूनच दिलेली असतात. ही कागदपत्रे नागरिक स्वतः तयार करत नाहीत. असे असताना, नागरिकत्वाचा पुरावा म्हणून ही कागदपत्रे अवैध ठरवणे कितपत योग्य आहे? सर्वसामान्य नागरिकांकडे सरकारने दिलेली हीच कागदपत्रे असतात. जर ही कागदपत्रे अवैध ठरवली, तर कोणताही माणूस भारताचा नागरिक राहू शकणार नाही! सामान्य माणसासाठी नागरिकत्व सिद्ध करणे खूप कठीण होईल.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### महाराष्ट्राचे राज्यपाल एनडीएकडून उपराष्ट्रपतीपदाचे उममेदवार

नवी दिल्ली-एनडीएकडून उपराष्ट्रपतीपदासाठी अखेर उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डांकडून उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. सी.पी.राधाकृष्णन हे सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. महाराष्ट्राचे सध्या राज्यपाल असलेले सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाची एनडीएकडून उपराष्ट्रपती पदाच्या उमेदवारासाठी घोषणा करण्यात आली आहे. भाजपच्या संसदीय मंडळाच्या बैठकीमध्ये उपराष्ट्रपती पदासाठी सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली आहे. सी. पी. राधाकृष्णन हे मुळ तामिळनाडूचे आहेत. भाजपच्या संसदीय मंडळाच्या बैठकीमध्ये उपराष्ट्रपती पदाच्या उमेदवाराच्या निवडीवर प्रदीर्घ चर्चा झाली, त्यानंतर उपराष्ट्रपती पदासाठी सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली आहे.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-११३ | सोमवार, दि.१८ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### स्वबळावर निवडणुका लढवण्याचे भुजबळांचे संकेत?

नाशिक-राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार जळगाव जिल्हा दौऱ्यावर होते. तिथे झालेल्या सभेत मंत्री छगन भुजबळही उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ यांनी अजित दादांच्या समोर शरद पवारांच्यासोबत जळगाव जिल्ह्यात आल्याच्या आठवणी ताज्या केल्या. तसेच प्रत्येक जिल्हा परिषदा, महापालिका नगरपालिका यावर राष्ट्रवादीचा झेंडा फडकला पाहिजे असेही त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना सांगितले. भुजबळ यांनी एकप्रकारे निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत.

### अजितदादा हे जातीवादी नेते-लक्ष्मण हाके

मुंबई-उपमुख्यमंत्री अजित पवार हे जातीवादी नेते आहेत, असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. अजित पवार हे ठेकेदार, कॉन्ट्रॅक्टर, भांडवलदार, कारखानदार यांचे नेते असल्याचे म्हणत ते जातीयवाद करत असल्याचा आरोप हाकेंनी केला आहे. पवार कुटुंब म्हणजे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आहे. अजितदादा पवार यांचा महाज्योती संदर्भातील सामाजिक दुजाभाव मी वारंवार महाराष्ट्राला सांगितला आहे.

### पवारांनी सांगितला भुजबळांचा किस्सा

मुंबई-छगन भुजबळ गमतीचे आहेत. पोलिस अधिकाऱ्यांचा कपडे घातले. त्यांना विचारले की कोण आहात? होम गार्ड आहेत. त्यांना उचललं आणि तीन महिने तुरुंगात टाकले असा किस्सा शरद पवार यांनी सांगितला.

### १० हजार मतं गायब करण्याची ऑफर होती- बच्चू कडू

आमरावती : देशात मत चोरीचा मुद्दा तापला असतानाच आता आमदार बच्चू कडूंनीही खळबळजनक वक्तव्य केले आहे. विधानसभा निवडणुकीत न मिळणारी १० हजार मतं गायब करण्याची ऑफर देण्यात आली होती. असे खळबळजनक वक्तव्य बच्चू कडूंनी केले असून याबाबतचे पुरावे गोळा करुन ते सादर करणार असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

### कोल्हापुरात सर्किट बेंचचे दिमाखात लोकार्पण

कोल्हापूर : मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापुरात सर्किट बेंच मागणीला अखेर यश आले आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या सहा जिल्ह्यांचे मिळून कोल्हापुरात सुरू होणाऱ्या सर्किट बेंचला मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी अधिसूचना जारी केली. यानंतर रविवारी महाराष्ट्राचे सुपुत्र व सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा दिमाखात पार पडला आहे. आता सोमवार, दि. १८ ऑगस्टपासून कोल्हापुरात न्यायालयाच्या जुन्या इमारतीत सर्किट बेंचचे कामकाज सुरू होणार आहे.

# खिशातून एक रुपया न देता ३६ हजार मिळणार

## मोदी सरकारच्या या निर्णयाने शेतकऱ्यांना येणार चांगले दिवस

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**सरकारने पीएम किसान मानधन पेन्शन योजना (पीएम-केएमवाय) पीएम-किसानशी जोडली आहे. याचा फायदा देशातील कोट्यावधी शेतकऱ्यांना घेता येणार आहे. तुम्ही प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेत असाल तर तुम्हाला आता आणखी एका योजनेचा लाभ मिळणार आहे. सरकारने पीएम किसान मानधन पेन्शन योजना (पीएम-केएमवाय) पीएम-किसानशी जोडली आहे. याचा फायदा देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना घेता येणार आहे. विशेष म्हणजे या योजनेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला कोणतीही अतिरिक्त कागदपत्रे करावी लागणार नाहीत.**

पीएम किसान मानधन पेन्शन योजनेत, शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षांनंतर म्हणजे वृद्धापकाळात दरमहा ३००० रुपये, म्हणजेच वार्षिक ३६००० रुपये पेन्शन मिळेल. महत्वाची

पान २ वर



### वयाच्या ६० वर्षांनंतर पेन्शन

पीएम किसान मानधन पेन्शन योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याचे किमान वय १८ आणि कमाल वय ४० वर्षे असावे. या योजनेसाठी एकदा नोंदणी केल्यानंतर वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर तुम्हाला दरमहा ३००० रुपयांचे पेन्शन मिळेल. म्हणजेच वर्षभरात ३६००० रुपये मिळतील. ही पेन्शन उर्वरित आयुष्यासाठी मिळणार आहे. पेन्शनसाठी अर्ज केल्यानंतर तुम्हाला एक विशेष पेन्शन आयडी नंबर मिळेल जो तुम्हाला भविष्यातील कामासाठी उपयोगी ठरेल.

### या योजनेसाठी नोंदणी कशी करायची?

पीएम किसान मानधन पेन्शन योजनेसाठी नोंदणी करण्यासाठी तुम्हाला जवळच्या सार्वजनिक सेवा केंद्रात जावे लागेल. केंद्रात जाताना आधार कार्ड, बँक पासबुक, जमिनीशी संबंधित कागदपत्रे आणि पासपोर्ट आकाराचा फोटो सोबत न्या. सीएससी ऑपरेटर तुमच्या कागदपत्रांच्या मदतीने ऑनलाइन फॉर्म भरेल. तसेच ऑटो-डेबिट फॉर्म देखील भरला जाईल. यामुळे या योजनेसाठी लागणारे मासिक योगदान थेट बँक खात्यातून कापले जाईल. तुम्ही पीएम किसान योजनेचे लाभार्थी असाल, तर ही रक्कम सहाय्याने आपोआप कापली जाईल.

# गोरगरीब जनतेसाठी सदैव आवाज उठवणार

## आ.सुरेश धस यांचे प्रतिपादन; पिंपरी चिंचवडमध्ये आभार दौऱ्याला प्रतिसाद

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

**माझ्या भागातील इथे वास्तव्यास असणाऱ्या सर्व नागरिकांना मी सांगू इच्छितो गोरगरीब जनतेसाठी मी सदैव आवाज उठवत राहील. ते संतोष देशमुख प्रकरण असेल महादेव मुंडे प्रकरण असेल असे अनेक प्रकरण मी स्वतः जातीने लक्ष देऊन सामान्य जनतेचे काम करत राहील. मला मंत्रीपदाची हाव नाही मला सामान्य माणसांमध्ये राहून सामान्यांचे काम करायचे आहेत, असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी आभार दौऱ्यात केले. पिंपरी चिंचवडच्या आभार दौऱ्यात आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**





पिंपरी चिंचवड येथील वाल्हेकरवाडी आहेर गार्डन या ठिकाणी आष्टी -पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुरेश धस यांचा आभार दौरा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये मतदारसंघातील असंख्य हजारोच्या संख्येने नागरिक मतदार कार्यकर्ते उपस्थित होते. १७ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी तीन वाजता आमदार सुरेश धस यांचा आगमन झाले. यावेळी ढोल ताशाच्या गजरामध्ये आ. धस यांचे जल्लोषात स्वागत केले. तसेच यावेळी या आभार दौऱ्यास पिंपरी चिंचवड शहरातील

पान २ वर

# 'बिहारमधील निवडणुकीची चोरी होऊ देणार नाही'

## राहुल गांधी यांचा निर्धार

पाटणा । वृतसंस्था

संपूर्ण देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांची चोरी सुरू आहे. आता बिहारमध्ये तसे कारस्थान रचले जात आहे. मात्र, बिहारमधील निवडणुकीची चोरी होऊ देणार नाही, असा निर्धार लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रविवारी व्यक्त केला.

विरोधी पक्षांनी निवडणुकांमधील कथित



अनियमितता आणि मतचोरीचा मुद्दा लावून धरला आहे. अशात बिहारमधील विधानसभा निवडणूक जवळ येऊन ठेपली आहे. आगामी निवडणुकीआधी त्या

पान २ वर

## प्लॉट नावावर न करता महिलेची पाच लाखांची फसवणूक

### आष्टी पोलिसात पाच जणांविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा दाखल

आष्टी । प्रतिनिधी

येथील विधवा महिलेच्या कुटुंबाकडून पाच लाख घेऊन प्लॉट नावावर करून देण्याचे ठरवले असताना देखील प्लॉट नावावर केला नाही. मागील आठ वर्षांपासून पैसे परत देण्यास देखील टाळाटाळ होत असल्याने सदरील महिलेच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात १५ ऑगस्ट रोजी पाच जणांविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील सपना विजय तांगडे या महिलेने मयत पति,व इतरांच्या समोर घरापासून जवळच असलेला एक प्लॉट बघितला व त्याचा पाच लाखात व्यवहार ठरला. त्याकरिता जून २०१५ मध्ये रोख एक लाख व आक्टोबर २०१५ मध्ये चार लाख रूपयाचा एसबीआय बँकेचा धनादेश असे एकूण पाच लाख रूपये दिले. परंतु आजपर्यंत सदरील प्लॉट महिलेच्या नावे करण्यात आले नाहीत. प्लॉट नावावर करा, नाहीतर पैसे परत द्या असे वेळोवेळी बोलून देखील

पान २ वर

## कोरोनानंतर आता ब्रेन इटिंग अमीबाचे संकट

नवी दिल्ली । वृतसंस्था

कोरोनानंतर देशावर आता मेंदू खाणाऱ्या अमीबाचे संकट आले आहे. केरळच्या कोझिकोडामध्ये मेंदू खाणाऱ्या अमीबामुळे ९ वर्षीय मुलीच्या मृत्यू झाला आहे. तर या भीषण व्हायरसमुळे आतापर्यंत चौघांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

## अजित पवारांनी गुंडांची टोळी पोसली- विजयकुमार घाडगे

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे सोडून राज्याचे कृषी मंत्री सभागृहात रम्मी खेळत असल्याने आंदोलनाचा भाग म्हणून आम्ही सुनिल तटकरे यांना लातूर मध्ये पत्ते भेट दिले होते. त्यानंतर राष्ट्रवादीच्या गुंडानी माझ्यावर प्राणघातक हल्ला केला. अजित पवार यांनी कृषी मंत्री यांच्याबद्दल निर्णय घेतला मात्र हल्ला करणाऱ्या गुंडांचा सन्मान करून त्यांना पक्षात मोठ स्थान दिलं. शेतकऱ्यांच्या पोराने शासनाला प्रश्न विचारले तर राष्ट्रवादीचे हे गुंड त्यांच्यावर हल्ला करत आहेत. हे अजित पवार गटाला परवडणारे नाही. आम्ही याचा बदला शेतकऱ्यांच्या कापसाला १० हजार रूपये, सोयाबीनला ८ हजार रूपये हमी भाव घेऊन आणि पिक विमा शेतकऱ्यांच्या पदरात पाडून अशा भ्याड हल्याचा बदला घेणार असल्याचे अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी केले.



ते बीडमध्ये शासकीय विश्रामगृह

पान २ वर

## जबरी चोरी करणारे पुण्यातील तिघे बीडमध्ये अटक



बीड । प्रतिनिधी

**अज्ञात तिघाने पिकअप चा पाठलाग करत अडून चालकाला मारहाण करत त्याच्याकडील ३९ हजार रुपयाची रक्कम लुटणारे पुणे जिल्ह्यातील तिघे चोरटे बीड पोलिसांनी जेरबंद केले आंतरजिल्हा पोलीस समन्वय्याने हे आरोपी पकडण्यात आले.**

आंतरजिल्हा गुन्हेगारावर नजर ठेवावी आणि वेळीच त्यांना अटक करावी अशा सक्त सूचना पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सर्व पोलिसांना दिलेले आहेत.कुरुळी, ता.खेड जि.पुणे या भागात कमलाकर बाबाजी मोहिते हे सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पिकअप गाडीने जात असताना तीन अनोळखी इसमानी त्याचा पाठलाग करून त्यांची गाडी अडवून त्यांना आरोपींच्या मारुती स्विफ्ट

पान २ वर

## जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक,सीईओ सोबतच बीडकर धावले मॅरेथॉनमध्ये

बीड । प्रतिनिधी

**नशामुक्त बीड जनजागृती मॅरेथॉनमध्ये आज पहाटे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्यासह अख्खं प्रशासन आणि बीडकरांनी केलेली दौड खरोखरचं उल्लेखनीय ठरली.**

प्रशासनातीलअधिकाऱ्यांसमवेत बीडकरांनी देखील'नशामुक्त बीड' या अभियानात सहभागी होत आपले योगदान दिले. नशामुक्तीसाठी सर्वांनी एकत्र येऊन लढण्याची आणि हा लढायशस्वी करण्याची गरज असल्याचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी सांगितले.चऱ्हाटा फाटा ते छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण ते चऱ्हाटा फाटा आणि चऱ्हाटाफाटा ते पुन्हा छत्रपती महाराज क्रिडांगणापर्यंत झालेल्या मॅरेथॉनमध्ये महसूल, पोलीस यासह इतर विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांसह राजकीय,सामाजिक पदाधिकारी, शहरातील नागरीक देखील मोठ्या





पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.५० क्विंटल | २,५५० | २,८७६ | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड :२३.५० क्विंटल | २,१२० | ३,४५० | २,५४४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,१५० | ६,१५० | ६,१५० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३४.५० क्विंटल | २,००० | २,९६० | २,६४२ |
| मुग: १.०० क्विंटल | ७,१५० | ७,१५० | ७,१५० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ५,५०१ | ६,००१ | ५,८४३ |

## वोट चोरी शब्द वापरणे हा भारतीय संविधानाचा अपमान

### मुख्य निवडणूक आयुक्तांचा राहुल गांधींवर नाव न घेता निशाणा

नवी दिल्ली । वृतसंस्था

**वोट चोरी असे शब्द वापरणे म्हणजे भारतीय संविधानाचा अपमान आहे, असा टोला केंद्रीय निवडणूक आयोगाचचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी नाव न घेता काँग्रेस नेते राहुल गांधी यांना लगावला. गेल्या काही काळात राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर सवालांची सरबत्ती केली होती.**

रविवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सादरीकरण करत त्यांनी निवडणूक चोरली गेल्याचा आरोप केला होता. त्यांनी दुबार मतदान, नवमतदार नोंदणी, एकाच ठिकाणी अनेक मतदार यात घोटाळा झाल्याचे राहुल गांधींनी सांगितले होते. त्या मुद्यांवर ज्ञानेशकुमार यांनी प्रेस कॉन्फरन्समध्ये आयोगाचे मत मांडले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार म्हणाले की,

पान २ वर

## वसंतदादा पाटलांचं सरकार का पाडलं शरद पवारांनी उघडपणे सारं सांगितलं

पुणे । प्रतिनिधी

**ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर विरोधकांकडून नेहमी दिवंगत माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचं सरकार पाडण्यावरुन राजकीय टीका केली जाते. पण त्यावेळी नेमकी राजकीय परिस्थिती काय होती? याबाबत शरद पवार यांनी आज एका कार्यक्रमात सविस्तर खुलासा केला आहे. ''काँग्रेसमध्ये आम्ही होतो तेव्हा काँग्रेस वेगळी झाली. निवडणूक झाली, कोणाला स्पष्ट बहुमत मिळालं नाही. त्यावेळेस काँग्रेसमध्ये एक राग असायचा. तेव्हा आम्ही ठरवलं. दादांचे सरकार घालवायचं आणि मी मुख्यमंत्री झालो. त्या १० वर्षांनंतर आम्ही परत एकत्र आलो. पण मुख्यमंत्री कोणाला बनवायचं? याची चर्चा झाली. वसंत दादांनी सांगितलं की, आता चर्चा नाही. पक्ष सर्वांचा आहे, म्हणून याचं नेतृत्व शरदकडे द्यायचं, असं वसंत दादा त्या काळात म्हणाले होते असं शरद पवार यांनी सविस्तर सांगितलं.**



''यशवंतराव चव्हाण यांचं भाषण म्हटलं तर आम्हा लोकांनी ते कधीच सोडलं नाही. नीट विषयावर मंत्रमुग्ध व्हावं, अशा प्रकारचे विचार हे यशवंतराव चव्हाण मांडायचे. विनायकराव पाटील आज हयात नाहीयत. ते पक्षाचे अध्यक्ष होते. त्यांचं मार्गदर्शन आम्हाला लोकांना असायचं. वसंतदादाचं देखील आम्हाला मार्गदर्शन असायचं. ही मोठी माणसं आहेत. या सगळ्या लोकांचं अंतकरण फार मोठं होतं. महाराष्ट्र ाच्या नेतृत्वाची फळी या ज्येष्ठ लोकांनी उभी केली आणि वर्षोनुवर्षे महाराष्ट्र एक देशाचं चांगलं राज्य होऊ शकला. त्याला राज्य चालवण्याची ताकद आणि दृष्टी असलेल्या नेतृत्वाची फळी या लोकांनी उभी केली. त्यामुळे महाराष्ट्राचा चेहरा बदललाय'', असं शरद पवार म्हणाले. ''या लोकांचं मन किती मोठं होतं याचे अनेक उदाहरणं सांगता येतील. मला आठवतंय,

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नागरिकत्व सिद्ध करणे कठीण

आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार कार्ड नागरिकत्वाचे पुरावे नाहीत असा महत्त्वपूर्ण निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. आधार, पॅन आणि मतदार कार्ड ही कागदपत्रे सरकारने वैध कागदपत्रे तपासूनच दिलेली असतात. ही कागदपत्रे नागरिक स्वतः तयार करत नाहीत. असे असताना, नागरिकत्वाचा पुरावा म्हणून ही कागदपत्रे अवैध ठरवणे कितपत योग्य आहे? सर्वसामान्य नागरिकांकडे सरकारने दिलेली हीच कागदपत्रे असतात. जर ही कागदपत्रे अवैध ठरवली, तर कोणताही माणूस भारताचा नागरिक राहू शकणार नाही! सामान्य माणसासाठी नागरिकत्व सिद्ध करणे खूप कठीण होईल.

निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या बिहारमधील मतदारयाद्यांच्या पुनरीक्षणावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. विरोधी पक्ष त्याविरोधात आक्रमक झाले आहेत. मतदारयादी पुनरीक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत न्यायमूर्तींनी मोठे विधान केले. आधार कार्ड हा ओळखीचा पुरावा होऊ शकत नाही असे सांगत सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाने आधार कार्डाबाबत घेतलेली भूमिका योग्य असल्याचा निर्णय दिला. बिहारच्या मतदारयाद्यांप्रकरणी सुरू असलेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने आधार हा ओळखीचा पुरावा होऊ शकत नाही. त्यातही पडताळणीनंतरच ते स्वीकारले पाहिजे. मतदारपात्रता सिद्ध करण्यासाठी आधार पुरेसा नाही, असे स्पष्ट केले. न्या. सूर्यकांत यांनी मतदारयादी पुनरीक्षणाबाबत निवडणूक आयोगाने घेतलेली भूमिका योग्य आहे. आधार कार्डला नागरिकत्वाचे निर्णायक प्रमाणपत्र म्हणून स्वीकार केला जाऊ शकत नाही, त्याचे सत्यापन होणे आवश्यक आहे असे म्हटले. या निर्णयामुळे बिहारमध्ये पुनरीक्षण करणाऱ्या निवडणूक आयोगाच्या भूमिकेला दिलासा मिळाला आहे. रेशन कार्ड, पेन्शन, बँक खाते, गॅस सबसिडी, डीबीटी ट्रान्सफर, मोबाईल सीमकार्ड, बँकिंग केवायसी, लाडकी बहीण योजना आणि इतर सरकारी योजनांसाठी आधार कार्ड आवश्यक आहे. आधार कायदा २०१६ नुसार आधार हा ओळख आणि पत्त्याचा पुरावा असू शकतो. पण कायद्याने अनिवार्य केल्याशिवाय आधार क्रमांक नसल्यामुळे कोणालाही सेवा नाकारता येत नाही. २०१८ मध्ये दिलेल्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, आधार अनेक सरकारी योजनांमध्ये वापरता येते, परंतु सर्व सेवांसाठी ते अनिवार्य करता येत नाही. बिहारमधील मतदारयादी फेरपडताळणी विशेष मोहिमेविरुद्ध दाखल केलेल्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. निवडणूक आयोगाने २४ जूनपासून सुरू केलेल्या एसआयआर मुळे बिहारमधील एक कोटी मतदार वंचित होतील, असा युक्तिवाद वकील कपिल सिब्बल यांनी केला. राजदचे नेते मनोज झा यांच्या वतीने ही याचिका दाखल करण्यात आली होती. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावर न्या. सूर्यकांत व न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने म्हटले की, एसआयआर प्रक्रियेचा वाद हा विश्वासार्हतेच्या कमतरतेशी संबंधित आहे. त्यात चुका होणे स्वाभाविक आहे. पण या प्रक्रियेत काही गैरप्रकार घडलाच तर मतदारयादी फेरपडताळणीची संपूर्ण प्रक्रिया रद्द केली जाऊ शकते. आधार क्रमांकाला निर्णायक पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही. निवडणूक आयोगाने आधार सत्यापित करण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु कोणत्याही स्थितीत आधार कार्ड हा नागरिकत्वाचा पुरावा होऊ शकत नाही. फार तर हा ओळखीचा पुरावा होऊ शकतो. आधार कार्डसंबंधी निवडणूक आयोगाने घेतलेल्या भूमिकेशी खंडपीठाने सहमती दर्शवली. आधार अधिनियमातील कलम ९ नुसार, नागरिक व बिगर नागरिकांना मतदारयादीत सामील करणे अथवा त्यांचे नाव वगळणे, हे निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात मोडते. याचिकाकर्ते आयोगाच्या भूमिकेशी सहमत असावेत.

बिहारमधील एसआयआर हा एक प्रारूप मसुदा आहे. त्यामुळे त्यात कधी कधी मृत व्यक्तीला जीवित दाखवले जाऊ शकते. पण, त्यासाठी पर्याय उपलब्ध आहे. पीडित व्यक्ती आक्षेप नोंदवू शकतात. अजूनही वेळ गेलेली नाही. आयोगाने अंतिम यादी जाहीर केलेली नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील कपिल सिब्बल म्हणाले की, बिहारमधील मतदारयादी फेरपडताळणीत घटनात्मक तरतुदींची पायमल्ली करून बुथ लेव्हल ऑफिसर व इतर अधिकारी मनमानी करत आहेत. याचवेळी अभिषेक मनु सिंघवी, प्रशांत भूषण, योगेंद्र यादव यांनी सुद्धा एसआयआरवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुंबई उच्च न्यायालयाने बांगलादेशी व्यक्तीच्या बेकायदेशीर स्थलांतरावर सुनावणी करताना एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. केवळ आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र यासारखी कागदपत्रे भारताचे नागरिकत्व सिद्ध करू शकत नाहीत. असे जर असेल तर सर्वसामान्य नागरिकांचेही नागरिकत्व धोक्यात येईल. मग नागरिकत्वाचा खरा पुरावा कोणता? नागरिकत्व कायद्यानुसार बनावट कागदपत्रांच्या आधारे नागरिकत्व मिळवण्याचा प्रयत्न करणे हा एक गंभीर गुन्हा आहे. बनावट कागदपत्रे कशी मिळवली जातात आणि यावर कोणतीही यंत्रणा शोध का घेत नाही, हे प्रश्न अनुत्तरित राहतात.

# जालना खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध

## संचालक मंडळाचा आ.खोतकर यांच्या हस्ते सत्कार



जालना | प्रतिनिधी

**जालना तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध संपन्न झाली असून भाग्यनगर येथील संपर्क कार्यालयात शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार करण्यात आला .**

यावेळी आमदार खोतकर यांनी सांगितले की जालना खरेदी विक्री संघाची निवडणूक आम्ही शिवसेनेच्या वतीने माजी चेअरमन अच्युतराव कदम यांच्या नेतृत्वाखाली आम्ही लढवली असून ती पूर्णत बिनविरोध पार पडली,आणी पुन्हा एकदा ही संस्था बहुमताने आम्ही आमच्या ताब्यात घेण्यासाठी यशस्वी झालो आहोत याचा आपल्याला अभिमान आहे. या निवडणुकीत खासदार कल्याणराव काळे, माजी मंत्री राजेश टोपे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण , भास्करराव आंबेकर यांचे सहकार्य लाभले असून त्यांचेही आपण आभार व्यक्त करतो. जालना तालुका खरेदी विक्री संघाची परिस्थिती अत्यंत डबघाईला आली असून या आर्थिक परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी आपण सर्व तरी प्रयत्न करणार असून यासाठी लागेल ती मदत खरेदी विक्री संघ या संस्थेला करण्यात येईल अशी आमदार खोतकर यांनी सांगितले. याप्रसंगी , जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते यांच्यासह खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित संचालकचा सत्कार करण्यात आला.

# अतिवृष्टी अनुदान घोटाळा प्रकरणी लवकरच गुन्हे दाखल होणार? ;प्रशासनाची तयारी पूर्ण

जालना | प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांसाठी मंजूर अनुदान वाटपात तब्बल ७९.६७ कोटी रुपये (७९६,७९७,०३८ रुपये) अपहाराचा घोटाळा उघडकीस आला आहे. याप्रकरणी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांना विचारले असता ते म्हणाले की अंबड व घनसावंगी तालुक्यातील अनुदान अपहार करणाऱ्या विरुद्ध लवकरच गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून त्या संबंधित अंबड उपविभागीय अधिकारी त्यांच्या स्तरावर पुरावा सादर करून संबंधित अनुदान घोटाळा प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच याप्रकरणी प्रशासनाने गुन्हा दाखल करण्यासाठी तयारी पूर्ण झालेली आहे अशी पण माहिती समोर येत आहे . याप्रकरणी २५ ते ३० जनाविरुद्ध गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे असे पण बोलल्या जात आहे. याप्रकरणी आ.बबनराव लोणीकर यांनी परतुर मध्ये पत्रकार परिषद घेऊन ते म्हणाले की अजून कोणी अधिकारी असतील त्यांची मार्फत तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून या घोटाळ्याची खरी व्याप्ती, जी १५० कोटींहून अधिक असू शकते, समोर येईल.**

लोणीकर यांनी पत्रकार परिषदेत संतप्तपणे सांगितले की, शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेचे मूळ केंद्रबिंदू आहेत. त्यांनी दोषी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक आणि तहसीलदार यांना संरक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक दाखल करण्यास टाळाटाळ केली आहे. ''काही अधिकाऱ्यांनी घोटाळ्याचे अनेक कागदपत्र दाबून ठेवले आहेत. त्यांनी मोठमोठे आकडे लपवले असून, या भ्रष्टाचाराची खरी रक्कम १५० कोटींहून जास्त आहे. चौकशीशिवाय या प्रकरणाची सत्यता समोर येणार नाही,'' असे लोणीकर यांनी सांगितले. घोटाळ्याचा तपशील: जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी नेमलेल्या आठ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानुसार, अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील एकूण अपहार रक्कम ७९६,७९७,०३८ रुपये (७९.६७ कोटी रुपये) आहे. यातील तपशील खालीलप्रमाणे आहे: अंबड तालुका (१३८ गावे) बोगस शेती नसलेले खोटे लाभार्थी१४,३५४ लाभार्थी, अपहार रक्कम ३३९,१७१,३५४ रुपये. डबल/दुबार अनुदान लाभार्थी २,३१९ शेतकरी, अपहार रक्कम ४१,७६०,३८४ रुपये. क्षेत्र वाढवून बोगस अनुदान ३,०९७ लाभार्थी, अपहार रक्कम ६१,५०१,८९६ रुपये. शासकीय जमिनीवर अनुदान २२ प्रकरणे, अपहार रक्कम ६७३,७६० रुपये. एकूण अपहार रक्कम ४४३,१०७,३९४ रुपये. घनसावंगी तालुका (११५ गावे) बोगस शेती नसलेले लाभार्थी ११,९६१ लाभार्थी, अपहार रक्कम २१२,१००,८९५ रुपये. डबल/दुबार अनुदान लाभार्थी १०,५४५ शेतकरी, अपहार रक्कम १२५,९७१,४४८ रुपये. क्षेत्र वाढवून बोगस अनुदान ८६१ लाभार्थी, अपहार रक्कम १५,१०४,०१६ रुपये. शासकीय जमिनीवर अनुदान २२ प्रकरणे, अपहार रक्कम ५१३,२८४ रुपये. एकूण अपहार रक्कम ३५३,६८९,६४४ रुपये. एकूण अपहार (अंबड घनसावंगी) ७९६,७९७,०३८ रुपये (७९.६७ कोटी रुपये). लोणीकर यांनी सांगितले या प्रकरणात तहसीलदारांचे लॉगिन आणि पासवर्ड वापरून बोगस एंट्री केल्या गेल्याचा उल्लेख केला, ज्यात ग्रामसेवक, कृषी सहायक आणि मंडळ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ९ ऑगस्ट २०२५ रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोषींवर दाखल करण्याचे आदेश दिले होते. मात्र, १७ ऑगस्ट पर्यंत गुन्हा दाखल झाला नाही परंतु गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच गुन्हे दाखल करण्यात येणार आहे अशी पण माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ५१ ज्ञानेश्वरी ग्रंथ घरपोच वाटपाचा शुभारंभ

बीड प्रतिनिधी

**साधकांचे मायबाप,अनाथांची माय, विश्वमाऊली श्री ज्ञानोबारायांच्या सातशे पन्नासाव्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त श्री.ज्ञानेश्वरी ग्रंथाचा प्रचार प्रसार व्हावा या उद्देशाने एकावन्न श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ मोफत व घरपोच वाटप उपक्रमाचा आज माऊली ज्ञानोबरायंच्या सातशे पन्नासाव्या जन्मदिनी म्हणजेच श्रावण वद्य अष्टमी अर्थात गोकुळाष्टमी , स्वातंत्र्यदिन व माऊली ज्ञानोबाराय जन्मदिन अशा तीन शुभ पर्वावर मोठ्या उत्साहात व आनंदात शुभारंभ करण्यात आला.**

या उपक्रमासाठी आज बीड शहरातील यशवंत नगर येथील परमार्थ प्रेमी व कॅनरा बँकेचे निवृत्त व्यवस्थापक श्री.मुकुंदराव भुतपल्ले काका यांना पहिल्या निवडीचा मान मिळाला. त्यांच्या यशवंत नगर येथील निवासस्थानी या उपक्रमाचा शुभारंभ झाला. भूतपल्ले काका यांच्या अंगणापासून घरापर्यंत माऊली ज्ञानोबरायांच्या जय घोषात ज्ञानदेव तुकारामांच्या गजरात ज्ञानेश्वरी ग्रंथाची मिरवणूक काढण्यात आली. उपक्रमाचे संयोजक माधव महाराज डाके यांच्या हातून मुकुंद भुतपल्ले व सौ. कांताताई यांच्या हाती ज्ञानेश्वरी ग्रंथ सोपवण्यात आला.यानंतर श्री.ज्ञानेश्वरी ग्रंथाची गंध,अक्षदा,पुष्पहार हळदी कुंकू,बुक्का यांनी पूजा करण्यात आली. माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरीतील पहिल्या अध्यायातील पहिल्या ओवीवर ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महिमान व उपक्रमाचा उद्देश वर्णन करणारे प्रवचन केले. या



संतश्रेष्ठ ज्ञानोबारायांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आमच्याकडे ह भ प डाके महाराज यांच्यातर्फे ज्ञानेश्वरी ग्रंथाचे आगमन झाले हा उपक्रम म्हणजे घरोघरी ज्ञानेश्वरी पोचवणे व आनंदाचे वाटप करणे होय आमच्याकडे या ग्रंथाच्या आगमनाने घरातली वातावरण प्रसन्न झालेच पण मनोमन आनंद झाला

–मुकुंद भुतपल्ले

कार्यक्रमास माळापुरी येथील श्रीराम गडाचे महंत .ह.भ.प. गोकुळ महाराज तुपे शास्त्री व डाके महाराजांचे पारमार्थिक मार्गदर्शक .ह भ.प. मोहन महाराज खरमाटे, किसन महाराज माने, निवृत्त पी.एस.आय. मेडे साहेब, दै.चंपावती पत्र चे पत्रकार महादेव (नाना) साळुंके महाराज,गणेश शेंडगे, खोसे महाराज, विणेकरी चाटे महाराज, मुकुंद भुतपल्ले ,जयेश भूतपल्ले , स्मिता भूतपले आई मुक्ताबाई व ज्ञानेश्वरी , कांता भुतपल्ले व संपूर्ण परिवार उपस्थित होता. कार्यक्रमाची सांगता सामूहिक पसायदानने झाली.

## पान १ वरून...

### खिशातून एक रुपया न

बाब म्हणजे शेतकऱ्यांना यासाठी कोणतीही गुंतवणूक करावी लागणार नाही. पीएम-किसानच्या वार्षिक ६००० रुपयांच्या निधीतून मासिक योगदान कापले जाणार आहे. महत्वाची बाब म्हणजे या पेन्शन योजनेत शेतकऱ्यांच्या खिशातून एक रुपयाही घेतला जात नाही. जर एखाद्या शेतकऱ्याने वयाच्या ४० व्या वर्षी या योजनेसाठी अर्ज केला तर त्याला दरमहा २०० रुपये जमा करावे लागतील. म्हणजेच वर्षाला २४०० रुपये थेट पंतप्रधान किसान योजनेच्या रकमेतून कापले जातील. यातून उरलेले ३६०० रुपये दरवर्षी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जातील. त्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फायदा मिळू शकतो.

---------

### 'बिहारमधील निवडणुकीची

राज्यात मतदार याद्या पडताळणीचे पाऊल उचलण्यात आले. त्या प्रक्रियेवर विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. आता आणखीच आक्रमक पवित्रा स्वीकारत इंडिया आघाडीचे घटक असणाऱ्या विरोधकांनी बिहारमध्ये मतदार अधिकार यात्रेचा मार्ग अवलंबला आहे. यात्रेच्या प्रारंभावेळी राहुल यांनी पुन्हा भाजप आणि निवडणूक आयोगावर जोरदार टीकास्त्र सोडले. निवडणूक आयोग भाजपशी संगनमत करून निवडणुका चोरत असल्याचे संपूर्ण देशाला ठाऊक झाले आहे. संबंधित चोरी कशाप्रकारे घडत आहे ते काँग्रेसने दाखवून दिले आहे. गरीब जनतेकडे केवळ मतांची ताकद आहे. त्या मतांच्या अधिकाराचे आम्ही रक्षण करू. जिथे-जिथे मतांची चोरी होईल; ती आम्ही पकडू आणि जनतेसमोर उघड करू. आमची लढाई राज्यघटना वाचवण्यासाठी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीवेळी आमच्या आघाडीने बाजी मारली. त्यानंतर काही महिन्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आमच्याच विजयाचे भाकीत जनमत चाचण्यांनी केले. प्रत्यक्षात वेगळेच घडले. मोठ्या संख्येने मतदार जोडण्याची जादू त्यासाठी कारणीभूत ठरली. जिथे अतिरिक्त मतदार जोडले गेले; तिथे भाजपचा विजय झाला, असा आरोप त्यांनी केला. इंडिया आघाडीने अनियमिततांविषयी तक्रार केली. मतदानावेळच्या व्हिडीओ फुटेजचीही मागणी केली. मात्र, निवडणूक आयोगाने नकार दर्शवला. कर्नाटकमधील एका विधानसभा मतदारसंघातील लाखभर मतांची चोरी आम्ही निदर्शनास आणून दिली. त्यावरून निवडणूक आयोगाने मला प्रतिज्ञापत्र देण्यास सांगितले. माझ्यासारखेच दावे भाजपच्या काही नेत्यांनी केले. मात्र, त्यांच्याकडे प्रतिज्ञापत्राची मागणी करण्यात आली नाही. मी मतचोरीची जी आकडेवारी सादर केली ती प्रत्यक्षात निवडणूक आयोगाचीच आकडेवारी आहे, अशी भूमिका राहुल यांनी पुन्हा अधोरेखित केली. बिहारमधील यात्रेच्या प्रारंभावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव, बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आणि इतर मित्रपक्षांचे नेते उपस्थित होते. ती यात्रा बिहारमधील २० जिल्ह्यांमधून सुमारे १ हजार ३०० किलोमीटर अंतराचा प्रवास करेल. त्या १६ दिवस मार्गक्रमण करणाऱ्या यात्रेत राहुल आणि तेजस्वी सहभागी होणार आहेत.

------------

### गोरगरीब जनतेसाठी सदैव

असंख्य उद्योजक व नागरीकांनी सुध्दा हजेरी लावली. यावेळी आ.धस यांनी सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले. यावेळी पुढे बोलताना आ. धस म्हणाले, पुढे म्हणाले माझ्या भागातील इथे वास्तव्यास असणाऱ्या सर्व नागरिकांना मी सांगू इच्छितो गोरगरीब जनतेसाठी मी सदैव आवाज उठवत राहील. मग ते संतोष देशमुख प्रकरण असेल, महादेव मुंडे प्रकरण असेल असे अनेक प्रकरण मी स्वतः जातीने लक्ष देऊन उजेडात आणली आहेत. आतापर्यंत आणि यापुढेही सामान्य जनतेचे काम करत राहील. मला मंत्रीपदाची हाव नाही, मला सामान्य माणसांमध्ये राहून सामान्यांचे काम करायचे आहेत. मेडिकल क्षेत्र असेल, नोकरी क्षेत्र असेल, कामगार क्षेत्र असेल या सर्व क्षेत्रातील तरुण-तरुणींना जी मदत लागेल ती मदत मी करत राहील व आपला समाज उच्च पदाला काम करून चांगल्या प्रकारे आयुष्य जगेल यासाठी माझे सदैव प्रयत्न असेल. तिथे असणाऱ्या मतदारसंघातील सर्व लोकप्रतिनिधीशी आपला चांगला संबंध आहे, पिंपरी चिंचवड आणि कोथरूड शहरांमध्ये अथवा पुणे शहरांमध्ये कोणत्याही भागामध्ये आपल्या ग्रामीण भागातील नागरिकांना त्रास होत असेल तर नक्की सुरेश अण्णांची आठवण काढून एक फोन करून कल्पना द्यावी. जेणेकरून मी इथल्या लोकप्रतिनिधींशी संपर्क साधून आपल्या अडीअडचणी दूर करू शकेल असे सांगून आ. धस म्हणाले, मी सर्वांना आश्वासित करतो मी सर्वांसाठी सदैव २४ तास कार्यतत्पर असेल अशी त्यांनी आष्टी-पाटोदा आणि शिरुर येथील मतदारांसमोर दिली. यावेळी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

---------------

### अजित पवारांनी गुंडांची टोळी

येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्षा अशोक रोमन यांच्यासह छावाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना विजयकुमार घाडगे म्हणाले की, राष्ट्रवादीच्या गुंडांनी माझ्यावर हल्ला केल्यानंतर चार दिवसाच्या उपचारांनंतर मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. तेव्हा अजित पवार म्हणाले ज्या पदाधिकाऱ्यांनी हल्ला केला त्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही. माणिकराव कोकाटे यांच्या बद्दल योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. कृषी मंत्री यांच्या बददूल अजित पवार यांनी निर्णय घेतला मात्र, आमच्या जखमा ओल्या असताना आमच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुंडांना पक्षाच्या फादर बॉडीत घेऊन अजित पवार यांनी नविन पायंडा पाडला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असा समज झाला आहे. की शेतकऱ्यांच्या विरुध्द राष्ट्रवादी अजित पवार गट आहे. शेतकऱ्यांच्या पोराला मारहाण करण्यासाठी अजित पवार यांनी गुंडांची टोळी ठेवली आहे. जशास तसे उत्तर छावा संघटना देत आहे. मात्र आम्ही या सरकारकडून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून त्याचा बदला पूर्ण करणार आहोत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण करूण घेणार आहोत. जर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले नाही तर नेत्यांना गाव बंदी करणार आहोत. असे विजयकुमार घाडगे म्हणाले.

**अशोक रोमन यांच्यावर लवकरच मोठी जबाबदारी**

अशोक रोमन यांनी बीड जिल्ह्यातील गोरगरीबांच्या प्रश्नांवर आवाज उठवून ते शासन दरबारी सोडवण्याचा प्रामाणीक प्रयत्न केला आहे. या सोबतच युवकांची मोठी फळी त्यांच्या मागे आहे. लवकरच त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी दिली. या पत्रकार परिषेदेला अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाप्रमुख अशोक अण्णा रोमन, संभाजीनगर जिल्हाप्रमुख अशोक मोरे पाटील, लातूर जिल्हा प्रमुख दीपक नरवडे, जालना जिल्हाप्रमुख संदीप ताडगे यांच्यासह विद्यार्थी आघाडी प्रमुख पप्पू लांडे पाटील, शहर प्रमुख सचिन हरणमारे, पप्पू शिंदे, पप्पू मस्के पाटील, दत्ता काशीद, दत्ता साळुंके, शंकर,श कुरळे, बाळू कदम, विठ्ठल अण्णा काळे, सिद्दिकी फारुकी, वाजेद खान, अविनाश हातागळे, अमोल अंकुटे, सतीश मस्के, गिरीश करवा आदी उपस्थित होते.

------------

### प्लॉट नावावर न करता महिलेची

प्लॉट परत न देता मानसिक त्रास देऊन फसवणूक केल्याने १५ ऑगस्ट रोजी सपना विजय तांगडे रा. कडा यांच्या फिर्यादीवरून आरोपी राजेंद्र शनतराव धुमाळ, श्रीपाळ शनतराव धुमाळ रा. कडा, श्रीमंत गहिनीनाथ गायकवाड, निलेश दिगंबर होनकसे, सुनील महावीर पंढरे रा. आष्टी ता. आष्टी.जि बीड यांच्यावर कलम ४२० नुसार आष्टी पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आष्टी पोलिसात त्या विधवा महिलेने तक्रार दिल्यानंतर पंचांहत्तर दिवसानंतर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

--------------

### जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक

संख्येने सहभागी झाले होते.यासाठी कालपासूनच नियोजन करण्यात आले होते मॅरेथॉन दरम्यान सहभागी नागरिकांना विनाअडथळा शर्यतीत सहभाग घ्यावा यासाठी वाहतूक व्यवस्थतीत बदल करण्यात आला होता.

-------------

### जबरी चोरी करणारे पुण्यातील तिघे बीडमध्ये अटक

या गाडीत शिवीगाळ व मारहाण करून बसवले व मुळशेवाडी येथे इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे नेऊन लूटमार करण्यात आली होती आणि यामध्ये कमलाकर मोहिते यांच्या बँक खात्यात पैसे नसल्याने आरोपींनी त्यांना त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीकडून फोनपे च्या माध्यमातून २४३०० रुपये घेतले तसेच त्यांच्याकडील रोख रक्कम १५००० रुपये व महाराष्ट्र बँकेचे ए टी एम कार्ड असा एकूण ३९५०० रुपयाचा ऐवज लुटण्यात आला होता.. या गुन्ह्यातील तीन आरोपी नामे १. नितिन मधुकर शिंदे, वय २६ वर्ष, रा. चाकण, पुणे २. वैभव गीताराम माने, वय २३ वर्ष, रा. चाकण, पुणे ३. विशाल ज्ञानोबा जाधव, वय ३२ वर्ष, रा. रमाई चौक, बीड हे गुन्हा करून फरार झाले होते परंतु पोलीस ठाणे म्हाळुंगे यांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की ते बीडमध्ये आलेले आहेत... सकाळी त्याचा संदेश आल्यानंतर बीड शहर डीबी पथकाचे पीएसआय महेश जाधव आणि पोह राठोड, बावनकर, पोअ राम पवार यांनी त्यांचा शहरभर शोध घेतला असता त्यांना एके ठिकाणी त्यांची गाडी लावलेली आढळून आली. त्या ठिकाणी मग सापळा रचला... परंतु दिवसभर ते त्या सापळ्यामध्ये अडकले नाही.. परंतु रात्री साडेदहाच्या सुमारास ते अलगद त्या सापळ्यात अडकले आणि तिघेही आरोपी पोलिसांच्या हाती लागले. या संपूर्ण प्रकरणांमध्ये पुणे पोलीस आणि बीड शहर पोलीस यांचा समन्वय अनोखा ठरला.. अशाप्रकारे समन्वयातून अंतर जिल्हा गुन्हे करणारी टोळी ही पकडण्यात आलेली आहे.. येथेही त्यांचा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याचा उद्देश होता हे तपासा स्पष्ट झाले आहे ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांचे बीड शहर डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोह राठोड, पोह बावनकर, पोअ पवार केली आहे.

-----------

### वसंतदादा पाटलांचं सरकार का पाडलं

काँग्रेसमध्ये ज्यावेळी होतो. काँग्रेस विभागली. इंदिरा काँग्रेस वेगळी झाली, एस काँग्रेस वेगळी झाली, आम्ही एस काँग्रेसमध्ये होतो. यशवंतराव चव्हाण होते. आणखी लोक होते आणि निवडणूक झाली. निवडणुकीमध्ये स्पष्ट बहुमत मिळालं नाही. काँग्रेसला काही जागा, आम्हाला काही जागा. शेवटी आम्ही एकत्र आलो आणि वसंतदादांना मुख्यमंत्री केलं'', असं शरद पवार म्हणाले आणि ते पुढे किस्सा सांगू लागले.''पण आमच्या तरुण लोकांचा त्यावेळेला काँग्रेसवर कायमच राग असायचा. आम्ही सगळे यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराचे. त्यामुळे आमच्यात एक अंतर होतं. वसंतदादा हे आम्हा लोकांचे नेते. पण शेवटी त्यांनी हे दोघे एकत्र यावे यासाठी प्रयत्न केले आणि त्याला आम्हा लोकांचा विरोध होता. त्या विरोधामध्ये जे प्रमुख होते, त्यामध्ये मी होतो. परिणाम काय झाला, एक दिवशी ठरवलं, दादांचं सरकार घालवायचं. आणि दादांचं सरकार आम्ही लोकांनी घालवलं. आणि मी मुख्यमंत्री झालो. माझ्या हातात सत्ता आली'', असं शरद पवार यांनी सांगितलं.''सांगायचं कारण असं त्यानंतर १० वर्षानंतर आम्ही परत एकत्र आलो. राज्याचा मुख्यमंत्री कोणाला करायचं याची बैठक होती. त्या बैठकीत अनेक लोक होते. वसंतदादांनी ही बैठक बोलावली. त्या बैठकीत अनेक नावांची चर्चा झाली. दादांनी सांगितलं, आता बाकी कुणाच्या नावाची चर्चा नाही. आज पुन्हा एकदा पक्ष सावरायचा आहे आणि पक्ष सावरायचा असेल तर पक्षाचं नेतृत्व शरदकडे द्यायचं हा निकाल त्यांनी दिला. ज्या व्यक्तीचं सरकार मी पाडलं ती व्यक्ती पुन्हा गांधी, नेहरुंचे विचार मजबूत करण्यासाठी मी काय केलं ही गोष्ट विसरुन मोठ्या अंतकरणाने पुन्हा एकत्र करण्याची भूमिका मानणारं असं हे नेतृत्व होतं'', अशी आठवण शरद पवार यांनी सांगितली.

------------

### वोट चोरी शब्द वापरणे हा

निवडणूक आयोग राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करत नाही. आमच्यासाठी कोणीही विरोधी पक्ष नाही. सर्वजण समकक्ष आहेत. १८ वर्षांवरील प्रत्येक जण मतदान करू शकतो. मतदार यादी पुनरीक्षणची (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) सुरवात बिहारपासून केली. यात सर्व पक्षांकडून निर्देशित केलेल्या बीएलओंनी एक प्रारूप यादी तयार केली. त्याची एक कॉपी सर्वांना दिली आहे. बिहारची ही यादी तयार करताना त्यावर सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी सही केली आहे. त्रुटी काढण्यासाठी निर्धारीत वेळेत सर्वजण वेळ आणि योगदान देत आहेत. २८३७० हरकती आल्या. १ जुलैपर्यंत १८ वर्षे पूर्ण झालेल्या किंवा १ ऑक्टोबरला १८ वर्षे पूर्ण करणाऱ्यांनीही अर्ज दिला आहे. बिहारच्या साठी अजुनही १५ दिवसांचा कालावधी आहे. सर्व पक्षांना आवाहन करत आहोत की, प्रारूप यादीत त्रुटी असेल तर निर्धारीत अर्जाद्वारे दाखवून द्यावे. आयोगाचे दरवाचे सर्वांसाठी खुले आहेत. सर्वजण पारदर्शक काम करत आहेत. सत्यापण, व्हिडिओ सर्वकाही केले जात आहे. मतदानानंतर ४५ दिवसांत याचिका दाखल केली गेली नाही. आता वोट चोरी असे शब्द वापरणे हा भारतीय संविधानाचा अपमान आहे. असे यावेळी सांगण्यात आले. दुबार मतदानाचे आरोप झाले. पुरावे मागितल्यावर उत्तर दिले गेले नाही. अशा आरोपांना निवडणूक आयोग घाबरत नाही. निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेऊन भारताच्या मतादारांवर निशाणा साधला जात असेल तर निवडणूक आयोग निर्भयपणे सर्व गरीब - श्रीमंत, लहान - मोठ्या सर्व धर्मांच्या मतदारांसोबत पहाडासारखा उभा आहे.

cmyk


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५






माजलगाव:- शेतकरी नेते डॉ. अजित नवले (माकप, राज्य सचिव) माजलगाव येथे आले असता त्यांचे डी.वाय.एफ.आय. युवक संघटना व एस.एफ.आय संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते कॉम्रेड बाबा सर, मोहन जाधव, रोहिदास जाधव, फारुख अण्णा, पवन चिंचाणे उपस्थित होते.

# लोकशाही मूल्यांची रुजवात करत निवडला शाळेचा विद्यार्थी नेता

## फ्लाईंग बड्र्स अकॅडमीमध्ये मिनी निवडणुकीत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**माजलगाव । प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठी आणि मजबूत लोकशाही असलेल्या भारताची निवडणूक प्रक्रिया लहान वयातच विद्यार्थ्यांना समजावी या उदात्त उद्देशाने येथील फ्लाईंग बड्र्स अकॅडमी शाळेने दि १६ ऑगस्ट शनिवार रोजी एक स्तुत्य उपक्रम राबवला, भारतीय संविधानाने घालून दिलेल्या मूल्यांवर आधारित या मिनी निवडणुकीत इयत्ता ३ री ते ९ वीच्या सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी एकत्र येत प्रत्यक्ष मतपत्रिकेवर आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान करून शाळेचा नेता म्हणून मिनी मुख्यमंत्री निवडला. हा उपक्रम केवळ एक निवडणूक नसून, भारतीय लोकशाहीचे महत्त्व आणि संविधानाने दिलेले हक्क व कर्तव्ये समजून घेण्यासाठी विद्यार्थी वयात एक आदर्श धडा ठरला.

विद्यार्थ्यांनी या निवडणूक प्रक्रियेत स्वतः सहभाग घेऊन निवडणुकीची अधिसूचना जारी करणे, आदर्श आचारसंहितेचे पालन, नामनिर्देशन पत्र दाखल करणे, उमेदवारी अर्ज मागे घेणे, वर्गात जाऊन प्रत्येक मतदारांच्या भेटी घेणे शाळेसाठी काय करेल यासाठी विद्यार्थी प्रचार सभेतून उमेदवारांचे भाषणे आदर्श आचारसंहितेचे पालन करत प्रचार आणि मतपत्रिकेद्वारे मतदान यांसारख्या खऱ्याखुऱ्या निवडणुकीतील सर्व प्रक्रियांचा छोटया विद्यार्थ्यांनी अनुभव घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची प्रामाणिक आणि निःपक्षपाती बाजू जवळून पाहता आली. या निवडणुकीत सात वर्गातील तीन पॅनल रिंगणात होते, विनय राम सरवदे, वेदिका विकास कोठुळे, नैतिक मधुकर मुरकुटे हे तीन उमेदवार विद्यार्थी नेते म्हणून " मिनी मुख्यमंत्री" पदासाठी



उभे होते. निवडणूक निकाला नंतर विनय राम सरवदे हा उमेदवार विद्यार्थी नेता म्हणून मुख्यमंत्री पदावर १७० इतक्या मताधिक्याने विजयी झाला. तसेच त्यांच्या पॅनल मधील विविध मंत्री पदासाठी उभे असलेले उमेदवार राहुल चांडक, कार्तिक नागनाथ शिंदे, ओंकार सोमेश्वर मिटकरी, अथर्व रमेश बाहेती, आदित्य गणपत आडे, स्वरूपा ज्ञानेश्वर कोरडे, तेजल तात्या झाटे, गणेश नवनाथ हुंबे, रचना छगन जाधव व कृष्णाली धनंजय शिंदे हे निवडून आले. निवडणूक निकाल घोषित झाल्या नंतर विजयी उमेदवार व त्यांच्या पॅनल कडून विद्यार्थ्यांनी गुलाल उधळत मोठा जल्लोष केला नंतर विद्यार्थ्यांमध्ये निवडणुकीचा उत्साह आणि लोकशाही मूल्यांचे पालन करण्याची जाणीव दिसून आली. या वेळी मुख्यध्यापिका सारिका बजाज, ऐश्वर्या चांडक, उपमुख्याध्यापिका ज्योती बनसोडे, उपमुख्यध्यापक सचिन गायकवाड, शाळेतील शिक्षक रमेश बाहेती सर, अंकिता तर्कसबंद, ममता शिंगाडे, बंडू पवार, सुखदेव माने, नागेश सोनवणे सर, हितेंद्र काळे यांच्यासह शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. तसेच निवडणूक अधिकारी कर्मचारी म्हणून अनुष्का राऊत, पायल जाधव, विराज थावरे, पृथ्वीराज घाटुळ, शेख अब्दुला, विराज वाघमारे, सोहम जाधव, विकास पारडे व श्रेया वाकणकर या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरित्या कामकाज पहिले. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर प्रत्यक्ष अनुभवातून समानता, न्याय, आणि निःपक्षपातीपणा यांसारख्या भारतीय राज्यघटनेच्या आदर्श मूल्यांचे महत्त्व समजून घेता आले. अशा या अभिनव उपक्रमांमुळे भविष्यात जबाबदार नागरिक घडण्यास मदत होईल असे मत प्राचार्या सारिका बजाज यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

## थोडक्यात...



### भारतीय लोकसंख्या आव्हान की संधी या भितीपत्रकाचे विमोचन

पाटोदा : येथील जयभवानी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागामार्फत दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त भारतीय लोकसंख्या आव्हान की संधी ? या विषयावर भित्तीपत्रकाचे पंचायत समिती पाटोदा माजी सभापती मा.श्री. रामकिसन भोंडवे, मा.श्री. दिलीपराव (भाऊ)जाधव, मा. श्री. बप्पासाहेब जाधव, प्राचार्य डॉ. विश्वास कदम, प्रभारी प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे आदी मान्यवरांच्या हस्ते भितीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. हे भितीपत्रक तयार करण्यासाठी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. शिवाजी काकडे, प्रा. पापाजी चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. हे भित्तीपत्रक कु. मकाळ निकिता, कु. कासरे सानिका, कु. मुंढे राणी, अदुरे सार्थक, भांडेकर सुरज आणि कोळेकर प्रदीप यांनी हे भित्तिपत्रक तयार केले. या भितीपत्रकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये लोकसंख्या लाभांश आहे का लोकसंख्या आव्हान आहे आणि लोकसंख्या लाभांश मिळवण्यासाठी कोणते धोरणात्मक उपाययोजना कराव्या लागतील आणि भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील लोकसंख्या बाबतीत कोणती आव्हाने आहेत याचे विस्तृत विवेचन केले आहे.

### दत्ताभाऊ थिगळे काळाच्या पडद्याआड

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नामांकित व्यक्ती दत्ताभाऊ थिगळे हे काळाच्या पडद्याआड गेल्यामुळे बीड शहरांमध्ये शोक कळा पसरली आहे दत्ताभाऊ थिगळे यांचे निधन झाले त्यांचा अंत्यसंस्कार शनिवारी सकाळी साडेआठच्या दरम्यान मोंढा रोड येथील अमरधाम या स्मशान भूमी मध्ये करण्यात आला त्यांच्या आत्म्यास चिरायू शांती लाभो असी श्री ईश्वराकडे प्रार्थना भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा श्री सोमेश्वर महादेव मंदिर तसेच महारुद्र मंदिर ट्रस्ट फाउंडेशनचे विश्वस्त नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी त्यांच्या परिवाराच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करून श्री ईश्वराकडे दत्ताभाऊ थिगळे त्यांच्या आत्म्यास चिरायू शांती लाभावी अशी प्रार्थना करण्यात आली आहे त्यांच्या दुःखात शिराळे पाटील परिवार सहभागी आहे असे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी आपल्या शोक संदेशात म्हटले आहे.



## नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र मंडळाने माजलगावात केली रोषणाई

माजलगाव । प्रतिनिधी

बाजार समितीचे तज्ञ संचालक तथा माजी सभापती नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमीत्त नितीनदादा मित्र मंडळाच्या वतीने मुख्य रस्त्यावरील स्ट्रिट लाईट पोलवर एलईडी ट्रप्सि लावुन रोषणाई करत शहर सुशोभिकरण केले आहे.

माजी सभापती नितीन नाईकनवरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यामध्ये शहरातील मुख्य रस्त्यावर असणा-या छत्रपती संभाजी महाराज चौक, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते डॉ.मौलाना अब्दुल कलाम चौकापर्यंत या मुख्य रस्त्यावरील स्ट्रिट लाईट पोलवर मागील दोन दिवसांपासुन एलईडी ट्रप्सि लावुन रोषणाई करत शहर सुशोभिकरण केले असुन या उपक्रमाचा सर्व स्तरातुन कौतुक होत आहे तर इतर




सामाजिक, राजकीय व विवीध क्षेत्रातील मान्यवरांनी देखिल असा उपक्रम राबवण्याची गरज आहे.

## जिल्हा परिषदेत सीईओ जितीन रहमान यांच्या हस्ते ध्वजारोहन

बीड । प्रतिनिधी

येथील बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात भारतीय स्वातंत्र्याचा ७९ स्वतंत्रदिन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन करून साजरा करण्यात आला.

यावेळी सामुहिक राष्ट्रगीत गायनानंतर देश भक्तीगीत सादरीकरण करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना स्वतंत्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सांगितादेवी पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे,



किशोर काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, जिल्हा बालविकास अधिकारी मनोज ससे, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (मा.) प्रियाराणी पाटील, कार्यकारी अभियंता मोमीन आदी विभाग प्रमुखांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे

वाढदिवस साजरा केला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्यानकार डॉ.वसंत हंकारे सर यांच्या व्याख्यानाला प्रारंभ झाला चला जगूया आनंदाने सुखी जीवनाचा मूल मंत्र व न समजलेल्या आई-बाबा या विषयावर व्याख्यान दिले अनेक विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींना त्यांच्या आई-बाबांची किंमत कळाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी केले तर सूत्रसंचालन सागर म्हेत्रे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.अंडील सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी वडवणी शहरातील तरुण, शाळेतील विध्यार्थी, पालक यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व उद्योग क्षेत्रातील व्यापारी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिंद्रुड येथे दहीहंडीचा

मंडळाच्या नैतिक मुसळे या नवतरुणाने चौथ्या मनोऱ्यावर चढाई करत दहीहंडी फोडण्याचा मान पटकावला. या दहीहंडीत वीस ते पंचवीस तरुणांनी चार मानवी थरांचा मनोरा रचत दहीहंडी फोडली. विजेत्या अक्षय चांदबोधले मित्र मंडळास माजी सरपंच अजय कोमटवार यांच्या हस्ते ३३३३ रुपयांचे प्रथम बक्षीस. तर २१०० रुपयांचे द्वितीय बक्षीस एकता गणेश मंडळास आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सपाटे यांच्या हस्ते देण्यात आले. दोन्ही विजेत्या स्पर्धकांनी मिळालेली बक्षीस रक्कम दिंद्रुड येथील होतकरू विद्यार्थी राहुल मारोती देशमुख यांच्या एमबीबीएस पदवी साठी आर्थिक मदत म्हणून विजेत्या संघानी दिली. याप्रसंगी दिंद्रुड व पंचक्रोशीतील शेकडो नागरिक उपस्थित होते. आयोजक विठ्ठल गवळी, काशिनाथ खांडेकर यांच्यासह अंगद पारेकर, सुभाष चांदबोधले, सिद्धेश्वर कटारे, सचिन साखरे, सुरेश किचमे, महादेव काटकर, नितीन वकरे, गणेश कटारे आदि युवकांनी या दहीहंडी चे नियोजन केले होते.

### बैलपोळ्याच्या सणानिमित्ताने

होत असते. आणि हाच बैलपोळा सण येत्या शुक्रवारी येत असल्याने युसूफवडगांव येथील आठवडी बाजार बैलपोळ्याच्या साहित्याने गजबजुन गेलेला पाहायला मिळाला बैलांना सजवण्यासाठी विविध रंगीबेरंगी मोरक्या, कंडे, घाट्या व चंगाळे उपलब्ध होते. शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना सजवण्यासाठी व विविध साहित्य खरेदीसाठी गर्दी केली होती.

### फॅशन शोमध्ये शौर्यची

द्या" फेम प्रसिद्ध विनोदी अभिनेते अंकुर वधावे, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती दीपा रोडे यांचा समावेश होता. या सर्व मान्यवरांनी शौर्यच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे आणि मिळालेल्या यशाचे कौतुक केले. तुलसी इंग्लिश स्कूलच्या यूकेजी वर्गाच्या शिक्षिका फातिमा शेख यांनी विद्यार्थ्यांची अतिशय उत्तम तयारी करून घेतली होती. प्राचार्या उमा जगतकर, शिक्षिका फातिमा शेख तसेच शौर्यचे आई-वडील यांच्या सततच्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच हे यश शक्य झाले. शौर्यने आपल्या नैसर्गिक आकर्षक व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास व प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. शौर्यच्या पुढील शैक्षणिक व कलागुणांच्या प्रवासासाठी सर्व स्तरातून त्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### कृषि उत्पन्न बाजार समिती

नरवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपसभापती श्रीहरी नाना मोरे, संचालक संजयजी कचरे, नंदकिशोर सजगणे, अमोल जाधव, भगवानराव आगे, प्रभाकरराव होके, खरेदी विक्री संघाचे आसाराम हुबाले, पंचायत समितीचे मा. उपसभापती वसिम मनसबदार, जेष्ठ नेते दयानंद स्वामी, मा. पंचायत समिती सदस्य मिलींद लगाडे, प्रदिप पट्टेकर, सहाय्यक सचिव रविंद्र नाईकनवरे, लेखापाल उध्दव फपाळ यांचेसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग पिंपळवंडी

असून पिंपळा खालचा महादेवावरून पिंपळवंडी गावाला पिंपळवंडी नाव पडले असावे अशी ही आख्यायिका आहे. मंदिरातील शिव महादेव पार्वती मूर्ती, भव्य शिवलिंग पिंड तसेच नंदीश्वरची भव्य मूर्ती भाविकांचे मन वेधून घेते. या मठ परिसरात मराठवाड्यातील एकमेव भगवान कार्तिक स्वामीचे मंदिर आहे. मंदिराच्या व मठाच्या परिसरात अनेक देवतांचे मंदिर आहेत. भगवान राधाकृष्ण, गुरु ईश्वरभारती मठ, श्री. गंगाभारती मठ परिसरात अनेक देवतांचे लहान-मोठे मंदिरे व मूर्तीचे दर्शन घडते. आज दि.१८/०८/२०२५ चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त होणाऱ्या या यात्रा उत्सवाला श्री. अश्वत्थलिंगाच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच परिसरातील व इतर ठिकाणाहून भाविक-भक्त दर्शन घेण्यासाठी येतात. शिवलिंग पिंडीस बेल पान अर्पण करून काही भक्तजन अभिषेक विधी करतात. चौथ्या श्रावणी सोमवार यात्रा उत्सवासह या ठिकाणी वर्षातून अनेक धार्मिक उत्सवासह यात्रा उत्सव होतात. त्यामध्ये महाशिवरात्री महोत्सव, श्री.स्वामी गंगाभारती महाराज पुण्यतिथी, श्री.अमृत भारती महाराज, श्री.स्वामी संतोष भारती महाराज, श्री.गुरु ईश्वर भारती महाराज पुण्यतिथी, कार्तिक पौर्णिमा, कार्तिक स्वामी दर्शन सोहळा, चैत्रपौर्णिमा यात्राचा समावेश असतो. श्री क्षेत्र देवस्थानचा महंत गुरुवर्य श्रीश्री १००८ ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या प्रयत्नाने व मार्गदर्शनात तसेच पिंपळवंडी, चंद्रेवाडी, आंबेवाडी, धोपटवाडी, जरेवाडी, सरदवाडी, हांडेवाडी, नाकाडेवाडी सह अंमळनेर, कोतन, भडकेल, खोपटी, पांगरी, पांढरवाडी, गांधणवाडी, बेदरवाडी, साबळेवाडी, माळेवाडी, उंडेवाडी, जाधववाडी, गायकवाडी, घोळेवाडी आदीसह पंचक्रोशीतील गावकऱ्यांच्या सहकार्याने विविध विकास कामातून मोठा कायापालट होऊन देवस्थानची किर्ती दूरवर पसरली आहे. यात्रेनिमित्त मिठाई, लहान मुलांची खेळणी, बेल पान पूजेच्या साहित्यांची प्रसादाची दुकाने मोठ्या संख्येने येऊन यात्रेची शोभा वाढवितात.

----------

## जयभवानी महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

दिनांक १२ ऑगस्ट २०२५: पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा १३३ वा जन्मदिवस 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. विश्वास कदम, अंतर्गत मुल्यमापन समितीचे प्रमुख प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा. ज्योती रकटे यांनी प्रास्ताविका



मध्ये भारतीय ग्रंथपालनशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम बोलताना म्हणाले की, आधुनिक भारतातील ग्रंथालयाच्या विकासात डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी मोलाचे योगदान दिले. ग्रंथालयशास्त्राचा प्रचार आणि प्रसार राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर केला. केवळ ग्रंथांचा संग्रह म्हणजे ग्रंथालय नव्हे तर ग्रंथ, वाचक व ग्रंथपाल या त्रिमूर्तीचे एकत्रीकरण म्हणजे खरे ग्रंथालय होय. अध्यक्षीय समारोपामध्ये प्रभारी प्राचार्य सोमनाथ घाडगे म्हणाले की, 'वाचनसंस्कृती ही आजच्या काळाची गरज आहे. 'गाव तेथे ग्रंथालय आणि सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी शालेय शिक्षणासोबतच निरंतर शिक्षण देखील किती आवश्यक असते याचे महत्त्व डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी सर्वप्रथम पटवून दिले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी मांडलेले 'ग्रंथालयशास्त्राचे पाच सिद्धांत, 'व्दिबिंदू वर्गीकरण ही पुस्तके ग्रंथालयशास्त्राचा पाया समजले जातात असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बंडू लोखंडे यांनी केले तर आभार डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर वृंद, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

## कै. चांदमलजी लोढा विद्यालयात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ चौसाळा, ता. जि. बीड च्या अध्यक्षा सौ संगीताताई अशोक लोढा व प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ चौसाळा चे सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य व भाजपा शहराध्यक्ष मा. अशोक चांदमल लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली १५/०८/२०२५ रोजी भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अंकुश नाना जोगदंड व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अजाउद्दीन मुजावर तसेच गावातील नागरिक व पत्रकार बंधू यांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण अंकुश नाना जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रम प्रसंगी इयत्ता बारावी मधील

प्रथम क्रमांक १) जाधव आदित्य नारायण द्वितीय क्रमांक २)कुमारी प्रियंका मिठूदास वैष्णव तृतीय क्रमांक ३) कुमारी वायसे निकिता संभाजी

या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता दहावीतील प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सुद्धा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रथम क्रमांक १) कुमारी अंकिता सिताराम



हावळे द्वितीय क्रमांक २) चि. अविष्कार विजय क्षीरसागर तृतीय क्रमांक ३) चि. रोहन संतोष तोडकर

या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच लोढा विद्यालयातील विद्यार्थिनी गावडे कविता नामदेव जलसंपदा विभाग धाराशिव या ठिकाणी इंजिनीयर या पदावर कार्यरत आहे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त हरघर तिरंगा उपक्रमा अंतर्गत दि १४/०८/२०२५ रोजी माऊली कॉम्प्युटर एम के सी आय मार्फत घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान परीक्षेत प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री रिठ्ठे व्ही.बी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री खाकरे एस ए, श्री तांदळे ए. एन एन श्री महामुनी एस एस श्री राऊत जे.एन, श्री वाघ आर बी श्री जाधव एम आर, माध्यमिक विभागाचे श्री पवार सर खाकरे सर शेख सर, वाघमारे मॅडम, पूजा सोनवणे मॅडम, भवर मॅडम, सोनवणे मॅडम, यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख श्री महामुनी सर यांनी केले व आभार श्री राऊत सर यांनी मानले व कार्यक्रम पार पाडला.

## महाराणी ताराबाई विद्यालयात नशा मुक्ती या विषयावर समुपदेशन व चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांच्या संकल्पनेतून नशा मुक्त बीड जनजागृती अभियान दि. १३ ऑगस्ट २०२५ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बीड जिल्ह्यात राबवण्यात येत आहे या अंतर्गत वडवणी पोलीस दलाच्या वतीने नशा मुक्ती विषयावर चित्रकला स्पर्धेच आयोजन करून त्याचे बक्षीस वितरण व समुपदेशनाचा कार्यक्रम दि. १६ ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी वडवणी शहरातील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे / डोईफोडे मॅडम तर प्रमुख पाहुण्या तथा समुपदेशिका म्हणून वडवणी पोलीस स्टेशनच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही.पी.व्हगाडे मॅडम तसेच वडवणी



पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई खरात सर, श्री.कापले सर, श्री.केदार सर, उपप्राचार्य मस्के सर, पर्यवेक्षक धाईतिडक सर, हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक श्री.डोईफोडे सर अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

नशा मुक्ती या विषयावर १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्यदिनी वडवणी पोलीस दलाच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेचा श्री.एम.बी.राऊत सर यांनी निकाल घोषित केला यामध्ये प्रथम क्रमांक कु.नारायणी भागवत तर द्वितीय क्रमांक कु.आलीया रफिक शेख व तृतीय क्रमांक कु.मायकर शिवाजंली तसेच कु.खाडे ऐश्वर्या, चि.अथर्व शेळके यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला या विद्यार्थ्यांचा कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही.पी.व्हगाडे मॅडम व कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांच्या शुभहस्ते नशा मुक्ती अभियानाचे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या तथा समुपदेशिका सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही.पी.व्हगाडे मॅडम यांनी नशा मुक्ती विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करून समुपदेशन केले व त्यांनी नशा मुक्तीची शपथ विद्यार्थ्यांना दिली नशा पासून दूर राहा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.


तशाच कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी चित्रकला स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचं अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती व्ही.पी.व्हगाडे मॅडम यांनी नशा मुक्ती विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून समुपदेशन केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले व कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## आज भारतीय सामाजिक समस्या ग्रंथाचे प्रकाशन

आष्टी । प्रतिनिधी

प्रा. डॉ. महेंद्र बन्सीधर वैरागे लिखित "भारतीय सामाजिक समस्या" या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे प्रकाशन सोहळा उद्या दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी येथे आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. ॲड. बी. डी. हंबर्डे यांच्या पुण्यतिथीनिमित्त होणार आहे.

कार्यक्रमाचे मान्यवर या प्रकाशन सोहळ्यास आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे, उपाध्यक्ष बाळासाहेब वर्धमाने, सचिव अतुल शेठ मेहर, सहसचिव श्रीमती सुलभाताई हंबर्डे, कोषाध्यक्ष डॉ गणेश पिसाळ ,संचालक प्रा. महेश चवरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे, प्रा. अविनाश कंदले, तसेच पिंपळेश्वर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सायली हंबर्डे यांचे शुभहस्ते ग्रंथाचे अनावरण करण्यात येणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी सर्वांना केले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१८ ऑगस्ट २०२५
४

# मांजरा धरणाचे ४ दरवाजे उघडले, बीड लातूरसह नदीकाठच्या गावांना सतर्कतेचे इशारे

मराठवाड्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असणाऱ्या मुसळधार पावसाने बीड, धाराशिव लातूर जिल्ह्यात बऱ्याच भागांना तडाखा बसलाय . लातूर-धाराशिव आणि बीड जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असलेल्या मांजरा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. लातूर शहराला पाणीपुरवठा करणारे हे मुख्य धरण ९०% पेक्षा अधिक भरल्यामुळे प्रशासनाने दरवाजे उघडण्याचा निर्णय घेण्यात आलाय .. मांजरा धरणातील ४ वक्रद्वारे प्रत्येकी ०.२५ मीटर उंचीने उघडून ३४९४.२८ क्यूसेक्स (९८.९६ क्यूमेक्स) इतका विसर्ग मांजरा नदीपात्रात सोडण्यात आला आहे. पुढील पावसाच्या स्थितीनुसार विसर्गात बदल करण्यात येईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

नदीकाठावरील तसेच पुरामुळे बाधित होऊ शकणाऱ्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. कोणीही नदीपात्रात उतरणार नाही.जीवित अथवा वित्तहानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अशा सूचना करण्यात आल्या आहेत . बीड, लातूर, धाराशिव आणि कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील प्रशासनाला



सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाटबंधारे विभागाने याबाबतचे पत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले होते . आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज राहण्याचे आदेश यात दिले होते. नदीकाठच्या गावकऱ्यांनी अनावश्यक धोका न पत्करता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, अशी विनंती करण्यात येत आहे. विशेषतः पूरकाठावरील शेती, जनावरांचे चारण तसेच घरांची सुरक्षितता याकडे ग्रामस्थांनी लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. मांजरा धरण क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे गेल्या १८ तासातच या प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात २२ टक्के इतकी मोठी वाढ झालीय. १५ ऑगस्ट रोजी दुपारी या धरणात ५७ टक्के असलेला पाणीसाठा १६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता थेट ८० टक्क्यावर पोहोचला आहे. यामुळे आता पुढील दोन वर्षांपर्यंत परिसरातील पाणी प्रश्न मिटला आहे.

बीड जिल्ह्यात असलेल्या मोठ्या प्रकल्पापैकी मांजरा एक असून याच मांजरा धरणातून बीड, लातूर,धाराशिव जिल्ह्यातील २२ गावांना पाणीपुरवठा केला जातो. तसेच या धरणाचे पाणी शेतीच्या सिंचनासाठी देखील वापरण्यात येते. लातूर जिल्ह्यातून १४५ किमी अंतर पार करत वाहणारी ही नदी. याच नदीवर मांजरा धरण बांधले असून ते लातूरकरांच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. नदीपात्रात सध्या पाण्याची मुबलकता असून तिच्यावर ११ बॅरेजेस बांधण्यात आले आहेत. रेना, तावरजा, तेरणा या नद्या तसेच अनेक ओढे मांजरा नदीत मिळत असल्याने प्रवाह अधिक वाढला आहे.

## ऊस पिकावरील रोगाचे लक्षणे, नुकसान व उपाय



गेल्या काही दिवसांत सतत होणारा रिमझिम पाऊस आणि मधूनच कोरडे हवामान यामुळे ऊस पिकावर लोकरी मावा या किडीचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो आहे. या किडीमुळे उत्पादनात २६% पर्यंत घट होते. साखरेचा उतारा ०.५ ते २ युनिटने कमी होतो. त्यामुळे वेळीच लक्ष देणे आणि उपाय करणे आवश्यक आहे.

किडीची ओळख :किडीचे दोन प्रकार: पंख असलेली आणि नसलेली. पंख नसलेला प्रकार अधिक नुकसानकारक. पिले पिवळसर-हिरवट रंगाचे व अतिशय चपळ. त्यांच्या शरीरावर पांढऱ्या रंगाचे लोकरीसारखे तंतू असतात त्यानेच ''लोकरी मावा'' हे नाव पडले.

जीवनचक्र :मादी दररोज १५-३५ पिलांना जन्म देते. एकूण ३०० पिलांपर्यंत जन्म देऊ शकते. एकूण आयुष्याचा कालावधी ३० दिवसांपर्यंत. १९ ते ३५ तापमान आणि ८०-९५% आर्द्रता असताना किडीचा जोर जास्त असतो. जूनपासून सुरुवात, पण सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये प्रादुर्भाव वाढतो.प्रसार कसा होतो :वाऱ्याने, मुंग्यांमुळे, किडग्रस्त पाने वा रोपे दुसरीकडे नेल्याने. शेतातले अवजारे किंवा बियाणे जर संक्रमित असेल तर प्रसार होतो.

नुकसान कसे होते :कीड पानाखालून रस शोषते, त्यामुळे पाने पिवळी पडतात, वाळतात. पाने काळसर होतात (काळी बुरशी विकसित होते). ऊस कमकुवत होतो, वाढ थांबते. साखर उतारा कमी होतो. एकाच पानावर ८०० पर्यंत कीड आढळते. ७ महिन्यांपेक्षा जुना ऊस आणि खोडवा उसामध्ये प्रादुर्भाव जास्त.

नियंत्रणाचे उपाय संक्रमित बेण्यांचा वापर टाळा. फक्त निरोगी बेण वापरा. पट्टा पद्धतीने लागवड करा, पिकात हवा खेळती राहू द्या. शेत स्वच्छ ठेवा, तण काढा.

नैसर्गिक शत्रू (प्रेमी कीटक) :डिफा ऑफिडिव्होरा, लेडी बर्ड बीटल, क्रायसोपा, मायक्रोमस, सिरफीड माशी हे परभक्षी कीटक लोकरी मावा खातात. यांचे संवर्धन शेतात फायदेशीर ठरते.

जैविक नियंत्रण :डिफा ऑफिडिव्होरा/कोनोबाथ्रा ऑफिडिव्होरा यांचे १००० अळ्या प्रति हेक्टर सोडाव्यात. किंवा मायक्रोमस अंडी २५०० प्रति हेक्टर. ऑगस्ट-ऑक्टोबर दरम्यान, दर १५ दिवसांनी सोडावे.

## जाणून घ्या हळद काढणीची पद्धत

लागवडी पासून ८ ते ९ महिन्यात हळद काढणीस येते. हळद पूर्णपणे तयार झाल्यानंतर तिची पाने पूर्णपणे पिवळी पडून खाली पडतात, मग तुम्ही समझू शकता की हळद काढणीस तयार आहे. अंदाजे काढणी ही फेब्रुवारी ते एप्रिल महिन्यापर्यंत चालते. काढणीची तारीख ठरल्यानंतर जमिनीला १५ दिवस अगोदर पाणी देणे बंद करावे. पाणी एकदम बंद न करता हळू हळू बंद करावे. पण जमीन जास्तच वाळली असल्यास काढणी करताना जमिनीस हलकेसे पाणी द्यावे, कारण हलकासा ओलावा असेल तर काढणी करणे हे सोप्पे राहते. सुरुवातीला वरील सर्व पाने जमिनीलागत कापून घ्यावीत. नंतर कुदळीच्या किंवा ट्रॅक्टर अवजाराच्या मदतीने हळद काढणे सुरू करावे. काढणी झाल्यानंतर जमीन तशीच २ ते ३ दिवस उन्हात तापू द्यावी जेणे करून कंदावरील माती वाळून जाईल व कंद खाली आपटल्यानंतर लगेच वेगळी होईल. कंद खाली आपटून जेठे गड्डे, बगल गड्डे, हळकुंडे, सोरा गड्डा, कुजकी सडलेली हळकुंडे अशा प्रकारे हळदीची प्रतवारी करावी. फक्त हे करताना कंदाला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. याच्यामधून आपल्याला प्रती एकरी १३० ते १५० क्विंटल ओल्या हळदीचे तर २५ ते ३० किलो वाळल्या हळदीचे उत्पादन मिळते. हळद काढणी नंतर १५ दिवसाच्या आत प्रक्रिया करावी. यामुळे रिकव्हरी आणि हळदीची क्वालिटी चांगली भेटते.




## सीताफळातील एकात्मिक कीड-रोग नियंत्रण

सीताफळ हे कोरडवाहू भागातील महत्त्वाचे फळपीक आहे. सध्या राज्यातील सीताफळ लागवड क्षेत्रात चांगला पाऊस पडत असून, फळधारणेस अनुकूल परिस्थिती आहे. मात्र सततच्या पावसाने बागांमध्ये आर्द्रता टिकून राहत असल्याने रोग व किडींच्या प्रादुर्भावास पोषक वातावरण तयार झाले आहे. सध्या पूर्णपणे उमललेल्या कळ्या व लहान आकाराच्या फळांवर तपकिरी काळपट डाग आढळून येत आहेत. हे डाग नेमक्या कोणत्या कीड किंवा रोगामुळे आहेत, हे जाणून घेऊन त्यानुसार वेळीच योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

थ्रिप्स (फुलकिडी) : फुलकिडीचे प्रौढ आणि पिले आकाराने लहान असून, ते नवीन आलेल्या कळ्या, नुकतीच फलधारणा झालेली फळे, पानाच्या पाठीमागील बाजूची मुख्य शिरा येथील पृष्ठभाग खरवडून बाहेर पडणारा द्रव शोषतात. परिणामी, नुकसान झालेला भाग तपकिरी रंगाचा होतो. कालांतराने तो काळपट पडतो. पाने वेडीवाकडी होतात. मोठ्या फळांवर देखील खरवडल्याचे डाग दिसून येतात. फळ वाढेल तसे खरवडल्याचे डाग वाढत जातात. प्रादुर्भावग्रस्त भाग कठीण होतो. फळांचा आकार वेडावाकडा होतो. परिणामी फळांना बाजारात अपेक्षित दर मिळत नाही.

मावा : मावा किडीचे प्रौढ आणि पिले नवीन आलेल्या कळ्यांमधून रस शोषून घेतात. ही कीड शरीरातून मधासारखा चिकट पदार्थ स्रवते. त्यावर काळी बुरशी वाढते. या किडीचा प्रादुर्भाव वाढल्यास फळधारणेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

टी मॉस्किटो बग : 'टी मॉस्किटो बग' या रसशोषक किडीची पिले व प्रौढ सीताफळाच्या झाडांची कोवळी फूट, कळ्यांचा व फुलांचा देठ, कोवळी व पक्व फळे या भागामधून रस शोषून घेतात. ती सोंड घुसवून रस शोषत असल्याने त्या ठिकाणच्या पेशी काळ्या पडून कठीण होतात. तयार झालेल्या ठिपक्यांचा आकार पुढे मोठा होतो. तिथे करपल्यासारखा काळा डाग पडतो. या किडीमुळे होणाऱ्या जखमांमधून फळसड रोगाच्या बुरशीचा प्रवेश होऊन पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शेंडेमर, शेंडे करपणे, कळ्या जळणे, फळे देठाजवळ काळी पडणे यासारखी लक्षणे



दिसून येतात.

उपाययोजना : ही कीड सीताफळ बागेत सध्या कमी प्रमाणात आढळत असली तरी तिची आर्थिक नुकसान पोहोचविण्याची क्षमता अधिक आहे. त्यामुळे या किडीबाबत सध्या सर्वेक्षण करून वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सीताफळाच्या बागेत स्वच्छता राखावी. नियोजनबद्ध एकात्मिक आणि संतुलित प्रमाणात खत व पाणी व्यवस्थापन करणे. किडीने आर्थिक नुकसानीची पातळी (५ टक्के नुकसानग्रस्त फळे) गाठल्यास किंवा या पेक्षा किडींची संख्या अधिक झाल्यास फवारणी करावी. (प्रमाण : प्रति १० लिटर पाणी) लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ६ मिलि किंवा बायफेन्थ्रीन (८ टक्के एससी) १२.५ मिलि किंवा थायाक्लोप्रिड (२१.७० टक्के एससी) १० मिलि. कीटकनाशकाची फवारणी करण्यापूर्वी काढणी पश्चात कालावधी तपासून फळकाढणीचा निर्णय घ्यावा.

पिठ्या ढेकूण (मिलीबग) : पिठ्या ढेकूण ही कीड पाने, कोवळ्या फांद्या, कळ्या आणि कोवळी फळे यातून रस शोषते. परिणामी, पानांचा, फळांचा आकार वेडावाकडा होतो. झाडांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. नवीन फुटींची व पानांची वाढ खुंटते. फळांची वाढ अयोग्य होऊन आकार वेडावाकडा होतो. या किडीच्या शरीरातून स्रवणाऱ्या मधासारखा चिकट पदार्थावर काळी बुरशी वाढते. परिणामी पाने, फळे काळी पडतात. फळांना बाजारभाव मिळत नाही.

उपाययोजना : पिठ्या ढेकणाची पिले खोडावरून झाडावर चढतात. यासाठी उपाय म्हणून ५ सेंटिमीटर रुंदीची प्लॅस्टिक चिकट पट्टी खोडाला चिकट बाजू वर ठेवून लावावी. त्याला पिले चिकटून मरतात. या किडीच्या पुढील प्रसाराला वेळीच आळा बसतो. परभक्षी मित्रकीटक क्रिटोलिमस मॉन्ट्रोझायरी प्रति एकरी ६०० या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ वेळा बागेत झाडावर सायंकाळच्या वेळी सोडावेत. भुंगेरे सोडल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या कीटकनाशकाची बागेवर फवारणी करू नये. लेकॅनोसिलिअम लेकानी (व्हर्टिसिलिअम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिश ऑइल रोझीन सोप ५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. आर्द्रतायुक्त हवामानामध्ये जैविक बुरशीनाशक उत्तम काम करते. त्यामुळे सध्या ही फवारणी फायदेशीर ठरेल.

फळसड : हा रोग कोलेटोट्रीकम ग्लिओस्पोराइडेस या बुरशीमुळे होतो. हा रोग आर्द्रतायुक्त दमट हवामानात अधिक दिसून येतो. मात्र कोरड्या हवामानात रोगाचे प्रमाण कमी असते. फळसड हा रोग फळवाढीच्या कुठल्याही अवस्थेत येऊ शकतो. मात्र कळ्या आणि लहान फळे रोगास जास्त प्रमाणात बळी पडतात. या अवस्थेत रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास कळ्या, लहान फळे आणि त्यांचे देठ काळे होऊन गळून पडतात. फळे मध्यम सुपारीच्या आकाराची (१५ ते २० मि.मी. व्यास) झाल्यावर प्रादुर्भाव झालेली फळे गळून न पडता लटकून राहतात. अशी रोगग्रस्त फळे न पिकता वाळून जातात व कडक होतात. अशाप्रकारे या रोगामुळे जवळजवळ ६० ते ७० टक्के नुकसान होण्याची शक्यता असते.

उपाययोजना : रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने बागेत वेळोवेळी नांगरट, जमीन तापू देणे आणि स्वच्छता या बाबी महत्त्वाच्या आहेत. छाटणी करतेवेळी गर्दी होत असलेल्या फांद्यांसोबतच झाडावर शिल्लक राहिलेली रोगग्रस्त फळे, फांद्या, पाने छाटून टाकावीत. छाटणीनंतर सर्व रोगग्रस्त अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावे. बहराचे पाणी देण्यापूर्वी किंवा पावसाळ्यापूर्वी पाणी देण्यासाठी झाडांभोवती वाफे करून सेंद्रीय व रासायनिक खताचा हप्ता द्यावा. त्यामुळे रोग किडीविरुद्ध झाडाची प्रतिकारशक्ती वाढते. फळे सुपारीच्या आकारापेक्षा मोठी झालेली असल्यास १ टक्का बोर्डो मिश्रणाच्या (१ किलो चुना अधिक १ किलो मोरचूद प्रति १०० लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब २० ग्रॅम अधिक कार्बेन्डाझिम १० ग्रॅम (टँक मिक्स) प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ फवारण्या घ्याव्यात.




### जागतिक दिवस:
### आंतरराष्ट्रीय आद्यनिवासी लोक दिन
### जागतिक हेलियम दिवस

### महत्वाच्या घटना

१८०० : ब्रिटीश कालीन भारतात कलकत्ता या ठिकाणी यांनी फोर्ट विल्यम महाविद्यालयाची स्थापना केली.
१८४१ : जगात सर्वप्रथम ब्रिटनमधे राष्ट्रीय अग्निशमन दलाची स्थापना
१८६८ : फ्रेंच खगोलशास्त्रज्ञ ज्यूलस जानसेन यांनी हेलियम वायूचा शोध लावला.
१९२० : अमेरिकेच्या संविधानात १९ वा बदल झाला आणि स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. पुरुषांच्या सोबत आपल्यालाही मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी अमेरिकेतल्या स्त्रियांनी आंदोलन सुरू केलं होतं. त्या आंदोलनाला अखेर यश मिळालं आणि १८ ऑगस्ट १९२० साली अमेरिकेतल्य स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.
१९४२ : शेरपूर येथील स्वातंत्र्यसैनिकांच्या एका समुहाने उत्तर प्रदेशातील गाझियाबाद जिल्ह्यातील मोहम्मदाबाद येथे तिरंगा फडकावला.
१९४५ : इंडोनेशियाच्या पहिल्या अध्यक्ष पदावर सुकारणो हे कार्यरत झाले.
१९४९ : हंगेरी राष्ट्राने प्रजासत्ताक राष्ट्राची घटना स्वीकारली.
१९५१ : पहिल्या पंचवार्षिक योजणे दरम्यान पश्चिम बंगाल मधील खडगपूर येथे भारतीय तंत्रज्ञान संस्थेची स्थापना करण्यात आली.
१९५८ : बांग्लादेश चे ब्रोजन दास इंग्लिश खाडी पार करणारे पहिले आशियाई ठरले.
१९६३ : जेम्स मेरेडिथ हा मिसिसिपी विद्यापीठातून स्नातक होणारा पहिला श्यामवर्णीय व्यक्ती झाला.
१९९९ : कोणताही गुन्हा शाबित झाल्यानंतर तुरुंगवास भोगत असलेल्या अथवा कोणत्याही कारणासाठी पोलिस कोठडीत ठेवण्यात आलेल्या व्यक्तीस मतदानाचा हक्क बजावता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.
२००५ : ईंडोनेशियाच्या जावा बेटावर वीज गेल्यामुळे १० कोटि लोक अंधारात
२००८ : हक्कभंगाची कारवाई होण्याची शक्यता असल्यामुळे पाकिस्तानचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनी राजीनामा दिला.
२०१८ : इमरान खान हे पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून निवडून आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७०० : थोरले बाजीराव पेशवे ऊर्फ श्रीमंत बल्लाळ बाळाजी भट (मृत्यू: २८ एप्रिल १७४०)
१७३४ : रघुनाथराव पेशवा (११ डिसेंबर १७८३)
१७९२ : युनायटेड किंगडमचे पंतप्रधान जॉन रसेल यांचा जन्म.
१८७२ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (मृत्यू: २१ ऑगस्ट १९३१)
१८८६ : सेवानंद गजानन नारायण तथा बाळूकाका कानिटकर अनाथ विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९)
१९०० : विजयालक्ष्मी पंडीत राजदूत, मुत्सद्दी व राजकारणी (मृत्यू: १ डिसेंबर १९९०). संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या पहिल्या भारतीय अध्यक्षा विजयालक्ष्मी पंडित यांचा आज जन्मदिवस आहे. विजयालक्ष्मी पंडित यांचा जन्म १८ ऑगस्ट १९०० रोजी झाला. त्या पंडित नेहरुंच्या भगिनी होत्या. १९५३ ते १९५४ या काळात त्या संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या आठव्या अध्यक्षा होत्या.
१९२३ : सदाशिव ऊर्फ 'सदू' शिंदे लेगस्पिनर व गुगली गोलंदाज (मृत्यू: २२ जून १९५५)
१९३० : संपूर्ण सिंग कालरा ऊर्फ 'गुलजार' गीतकार, कवी, लेखक व दिग्दर्शक
१९३६: रॉबर्ट रेडफोर्ड हॉलिवूडमधील तगडा अभिनेता, दिग्दर्शक, निर्माता, उद्योगपती, पर्यावरणवादी आणि दानशूर
१९५६ : संदीप पाटील धडाकेबाज फलंदाज
१९६७ : दलेर मेहंदी भांगडा गायक / पंजाबी पॉप गायक
१९८० : प्रीती जंघियानी अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२२७ : मंगोल सम्राट चंगीझ खान यांचे निधन.
१८५० : फ्रेंच लेखक ऑनोरे दि बाल्झाक यांचे निधन.
१८८६ : मॉर्टिस लॉक चे शोधक एली व्हिटनी ब्लेक यांचे निधन. (जन्म: २७ जानेवारी १७९५)
१९१९ : सीग्राम कंपनीचे संस्थापक जोसेफ ई. सीग्राम यांचे निधन. (जन्म: १५ एप्रिल १८४१)
१९४० : वॉल्टर ख्राइसलर 'ख्राइसलर' कंपनीचे संस्थापक (जन्म: २ एप्रिल १८७५)
१९४५ : नेताजी सुभाषचंद्र बोस (जन्म: २३ जानेवारी १८९७ कटक, ओरिसा)
१९७९ : वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (जन्म: १ जुलै १९१३)
१९९० : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार, प्रचारक व सरस्वती पत्रिकेचे संपादक तथा पत्रकार श्री नारायण चतुर्वेदी यांचे निधन.
१९९८ : पर्सिस खंबाटा अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका (जन्म: २ आक्टोबर १९४८)
२००८ : नारायण धारप रहस्यकथाकार (जन्म: २७ ऑगस्ट १९२५)
२००९ : दक्षिण कोरियाचे वे८ राष्ट्राध्यक्ष किम दे-जुंग यांचे निधन.
२०१२ : भारतीय पत्रकार आणि लेखक रा. की. रंगराजन यांचे निधन.

# ग्रामीण भागाला सिमेंट रस्ते जोडण्याच्या मुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्री यांच्या घोषणा कागदावरच

## लोकवर्गणीतून रस्ते ग्रामीण जनतेची शोकांतिका

बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत १००० लोकसंख्या असलेल्या गावातील प्रमुख रस्ते सिमेंट क्राकीटचे करण्यात येणार असुन त्यासाठी १८ हजार कोटी रूपयांचा निधी मंजूर झाल्याची घोषणा केली. तर ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना वस्त्यापर्यंत पोहोचण्यासाठी सुसज्ज रस्ते मिळावेत. यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण भागाला जोडणारे १० हजार किलोमीटर पर्यंत व्हाईट टॉपिंगचे सिमेंटचे रस्ते तयार करणार येणार असल्याची घोषणा केली. मात्र ग्रामीण भागातील लोकांना लोकवर्गणीतून रस्ते करण्याचे वेळ आली असून एकंदरीतच शासनाच्या घोषणा व योजना केवळ कागदावरच राबवले जात असून वस्तुस्थिती वेगळी असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बोलून दाखवली.बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील सरपंच विश्वंभर गिरी यांनी महाजनवाडी ते बोरखडे पंतप्रधान पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याच्या दुरावस्थेसाठी वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर ग्रामपंचायत मार्फत





रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

बोरखेड -महाजनवाडी पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याची थातुरमातुर दुरुस्ती केली जाते. प्रशासनाकडे वारंवार निवेदनाद्वारे पाठपुरावा करूनही प्रशासन दुर्लक्ष करत आहे. ग्रामस्थांना दुधदुभते, बाजारहाट, शालेय विद्यार्थी, दवाखाना याठिकाणी जाण्यासाठी अडचणी येत असल्याने शेवटी ग्रामपंचायत मार्फत रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले असल्याचे महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य विशाल घरत,बबन घरत, संजय घरत, शंकर घरत, ऋषिकेश घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते. सरकार मातोश्री पाणंद रस्ते योजना असेल अथवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी गावपातळीवर सिमेंट कॉंक्रीट रस्ते करण्याची घोषणा असेल या घोषणा केवळ कागदावर राहत असून ग्रामीण भागातील लोकांना पावसाळ्यात शेतमाल ,बि-बियाणे, दुध दुभते, बाजारहाट,शाळकरी मुलं दवाखाने आदींसाठी रस्त्यासाठी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही निधी उपलब्ध करून न दिल्याने अखेर लोकसहभागातून रस्ते करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

# लिंबागणेश येथे भागवत कथा सप्ताह



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सार्वजनिक महोत्सवानिमित्त संगीतमय श्रीमद् ? भागवत कथा सप्ताह (दशम स्कंध) उत्साहात पार पडला. दि. ८ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या धार्मिक सोहळ्याची सांगता दि. १६ ऑगस्ट रोजी काल्याच्या कीर्तनाने झाली. सप्ताहभर सकाळी पारायण, दुपारी उटी-उपहार, सायंकाळी आरती-प्रवचन आणि रात्री भागवत कथा असे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प.पू. महंत श्री ओंकार व्यास बाबा शास्त्री महानुभव ( श्रीक्षेत्र पांचाळेश्वर ता.गेवराई जि.बीड )यांच्या प्रवचनाने भाविकांना अध्यात्मिक अनुभव मिळाला.

समारोप प्रसंगी पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेस्कर, महंत विश्वनाथ बाबा, तसेच पंचक्रोशीतील महानुभव भाविक उपस्थित होते. भजनी मंडळींमध्ये मृदंगवादक संदीप आमटे,पांडुरंग वाणी, बाजीराव दशमे, बारीक ढास ,सतिश शिंदे आदींनी सुरेल भजनांनी वातावरण भारावून टाकले. शुक्रवारी मध्यरात्री श्रीकृष्ण जन्मोत्सव अत्यंत जल्लोषात साजरा करण्यात आला. श्रीकृष्ण जन्मानंतर गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या धार्मिक सोहळ्यासाठी मंदिराचे पुजारी विजय पाटोदेकर, राजेभाऊ आप्पा गिरे, कल्याण वाणी, सरपंच बालासाहेब जाधव, गोवर्धन गिरे, रामकिसन गिरे, अर्जुन गिरे, सुदाम रणखांब, विनायक वाणी, विक्रांत वाणी, संतोष भोसले, विठ्ठल कदम, रणजित भोसले, बसवंता खाडीलकर आदी मान्यवर व गावकरी यांनी परिश्रम घेतले. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि सप्ताहाचा समारोप भक्तीमय वातावरणात झाला.

# ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखाली भव्य राष्ट्रीय एकात्मता रॅली उत्साहात

## बीड मध्ये पहिल्यांदाच तिरंगा रॅली चे आयोजन; ध्वजारोहण करुन रॅलीची सुरुवात आणि राष्ट्रगीत सागता



बीड । प्रतिनिधी

दि. १६ ऑगस्ट २०२५: ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली मुख्य कार्यालय, बशीरगंज येथून सुरू झालेली भव्य राष्ट्रीय एकात्मता रैली आज हजारोंच्या संख्येने उपस्थित नागरिकांच्या उत्साहपूर्ण सहभागाने यशस्वीपणे संपन्न झाली. या रैलीने सामाजिक एकता, बंधुभाव आणि राष्ट्रीय अभिमानाचा संदेश सर्वदूर पोहोचवला.सकाळी मुख्य कार्यालयापासून सुरू झालेल्या या रैलीत विविध समाजघटकांतील युवक, आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ''हिंदुस्थान जिंदाबाद'', ''हम सब एक है'', ''हिंदू-मुस्लिम भाई-भाई'' आणि अशा नाऱ्यांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. रैलीच्या मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी रैलीचे स्वागत केले, ज्यामुळे एकतेचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

रैलीचा मार्ग मुख्य कार्यालयापासून सुरू होऊन शिवाजी महाराज पुतळा, शहेनशाहा नगर, बार्शीनाका, मोमीन पुरा, डॉ. आंबेडकर चौक, माळीवेस, बलभीम चौक, कारंजा मार्गे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टिपर्पज ग्राउंड) येथे पोहोचला. मार्गात ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांनी रैलीला प्रचंड प्रतिसाद देत सहभाग घेतला. रैलीदरम्यान सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश आला.रैलीचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर राष्ट्रगीताने झाला. यावेळी उपस्थित सर्वांनी एकजुटीने राष्ट्रगीत गायन करत राष्ट्रीय अभिमान व्यक्त केला. ॲड. शेख शफीक भाऊ यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय एकतेचे महत्त्व अधोरेखित करत, सर्व समाजघटकांना एकत्र येऊन देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. त्यांनी युवकांना सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी पुढाकार घेण्यास प्रेरित केले.या रैलीला स्थानिक नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. रैलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल ॲड. शेख शफीक भाऊ यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या रैलीने न केवल शहरातच, तर संपूर्ण परिसरात राष्ट्रीय एकतेचा आणि बंधुभावाचा संदेश प्रभावीपणे पोहोचवला आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# राठी डिपार्टमेंटलच्या बांधकामाची चौकशी करून कारवाई करा-घोलप

अंबड । प्रतिनिधी

शहरातील राठी डिपार्टमेंटल व रेडीमेड कपड्याचे दुकान तसेच घर याचे बांधकाम परवान्यानुसार झाले नसल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. सदर बांधकाम अधिनियमाअंतर्गत झाले नसल्यास कायदेशीर कारवाई करावी तसेच संबंधितांच्या मालकीचे एकुण क्षेत्रफळ व बांधकाम परवाना उपलब्ध करून देण्याची मागणी बाबासाहेब घोलप यांनी केली आहे. याप्रकरणी बरेच दिवसांपूर्वी अंबड नगर परिषदकडे तक्रार केल्या असून अध्यायापर्यंत चौकशी करण्यात आली नाही. तात्काळ चौकशी ना केल्यास न्यायालयामध्ये जाणार असे श्री घोलप यांनी सांगितले.

या संदर्भात अंबड नगर नगरपालिकाला दिलेल्या अर्जात बाबासाहेब लक्ष्मणराव घोलप यांनी म्हटले आहे की, मी अंबड शहरातील एक सुज्ञ नागरिक असून अंबड नगर परिषदेचे बांधकामाबाबत गरीब रहिवाशांना




जे नियम लागू होतात तेच नियम श्रीमंतांनाही लागू करावेत. अंबड शहरातील जालना-बीड रस्त्यावरील राठी डिपार्टमेंटल व रेडीमेड हे कपडयाचे दुकान तसेच घर असून ते कोणत्या सर्व्हे नंबरमध्ये आहे.

हे आपणांस माहित असून ती जागा हाऊसिंग सोसायटीची असल्याचेही कळते. परंतु सदरील जागेवर सध्या व्यावसायिक गाळे असल्याचे दिसून येते तसेच एकुण जागेचे क्षेत्र व बांधकाम परवानानुसार जागेचे क्षेत्र व तीन ते चार मजली बांधकाम यात तफावत दिसून येते.

त्यामुळे आपणास विनंती की, आपण सर्वांना समान नियम लागू करून अनधिकृत असलेले बांधकाम तसेच गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर व्यावसायिक गाळे तयार करुन राठी डिपार्टमेंटल व रेडीमेड कपडयाचे दुकान सुरु करण्यात आलेले आहे. ते दुकान तसेच त्यांचे राहते घर याबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करुन द्यावी, तसेच ते अनधिकृत झालेले बांधकाम आहे या बाबत आपण येत्या आठ दिवसाच्या आत योग्य ती कार्यवाही करावी नसता मला न्याय मिळवण्यासाठी मा. उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागेल असेही बाबासाहेब घोलप यांनी या निवेदनात शेवटी म्हटले आहे. या निवेदनाची प्रत मा. नगरविकास मंत्री ,पालकमंत्री जालना यांच्यासह विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तसेच जिल्हाधिकारी, जालना यांनाही देण्यात आली आहे.

# घनशी नदीवरील पुलाचे काम विजयादशमी पूर्वी पूर्ण करा- ॲड.मनोज संकाये

परळी । प्रतिनिधी

परळी वैजनाथ शहरातील डोंगर तुकाई देवी मार्गावरील बट भैरव मंदिराजवळील घनशी नदीवरील पुलाचे काम अद्यापही अपूर्णच आहे. विशेष म्हणजे देशातील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथ व श्री कालरात्री देवीची पालखी विजयादशमीच्या दिवशी पारंपरिक मार्गाने बट भैरव येथून वैद्यनाथ मंदिरात प्रस्थान करते. मात्र अद्यापही हा पूल पूर्ण न झाल्याने भाविकांच्या श्रद्धेचा व सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून या पुलाचे काम विजयादशमी पूर्वी पूर्ण करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड मनोज संकाये यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे



याबाबत सविस्तर वृत्त असे की, या पुलाचे काम मागील अनेक दिवसांपासून सुरू असूनही कामाचा वेग संथ आणि निष्क्रिय आहे. त्यामुळे विजयादशमीसारख्या महत्वाच्या धार्मिक सोहळ्यापूर्वी हा पूल वापरासाठी उपलब्ध होईल की नाही याबाबत शंका निर्माण झाली आहे. यासंदर्भात परळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्याशी कामाच्या संदर्भात चर्चा करून माहिती घेतली सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रशासनाला धारेवर धरत ''हा पूल विजयादशमीपूर्वी पूर्ण करावा अन्यथा तीव्र आंदोलन उभारले जाईल'' असा इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट केले की, भाविकांच्या सुरक्षेशी व धार्मिक परंपरेशी खेळ चालणार नाही.ॲड. संकाये म्हणाले, ''प्रभू वैद्यनाथ व देवी कालरात्रीच्या पालखी मार्गातील काम तातडीने पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. अन्यथा प्रशासनाच्या दिरंगाईला जबाबदार धरून आम्ही रस्त्यावर उतरू. धार्मिक भावना दुखावल्या गेल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ॲड मनोज संकाये यांनी दिला आहे.

# चंद्रशेखर आझाद मैदानात दहीहंडी महोत्सव भूमिपूजन संपन्न



जालना । प्रतिनिधी

शिवचैतन्य प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी महोत्सव २०२५ चे भूमिपूजन आज चंद्रशेखर आझाद मैदान येथे धार्मिक विधी व मंत्रोच्चारांच्या गजरात मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य श्री. राजेश राऊत व युवा नेते श्री. अक्षय गोरंट्याल यांच्या हस्ते कुदळ मारून भूमिपूजन करण्यात आले.

या प्रसंगी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे, रामेश्वर भांदरगे, शिवचैतन्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रतिक दानवे, सतिश जाधव, रमेश गोरक्षक, वर्षाताई ठाकूर, संगितातारई पांजगे, सखुबाई पनबिसरे, कपिल भूरेवाल, धनराज काबलीये, विष्णूबापू डोंगरे, शशिकांत घुगे, सुनिल पवार, संजय डोंगरे, सुनिल खरे, महेश निकम, सचिन मोहता, आनंद झारखंडे, सोमेश काबलीये, दत्ता जाधव, योगेश विधाते, रोहित दिपवाल, मनोज इंगळे, बद्रीनाथ भासंडे, कैलाश उबाळे, राजाराम जाधव, देविदास देशमुख, राजेश जोशी, रोहित खोडवे, कैलाश दानवे, केतन डोंगरे, अतिश अग्रवाल, पंकज देविदान, पृथ्वीराज देशमुख, गुलाब पनबिसरे, शाम उगले, सुहास वावरे, कृष्णा शिंदे, अजय कोल्हे, शुभम कापसे, ऋत्विक देवडे, आकाश बनवारी यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या भूमिपूजन सोहळ्याने दहीहंडी महोत्सवाच्या भव्य तयारीला सुरुवात झाली असून, यावर्षीचा सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# चौसाळा-नांदूरघाट रस्ता बनला मृत्यूचा सापळा

नांदूरघाट । प्रतिनिधी

राज्य महामार्ग ६४ नांदुर घाट चौसाळा हा रस्ता बीड तसेच धाराशिव जिल्ह्याच्या सीमा रेषेच्या जवळून जातो दळणवळणासाठी हा रस्ता प्रवाशांसाठी अगदी महत्त्वाचा आहे. रस्त्याची दुरावस्था गेल्या तीन वर्षापासून आहे. लोकप्रतिनिधी किंवा संबंधित अधिकारी या रस्त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. गेल्या काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे काम झाले होते करोडो रुपये शासनाने देखील यावरती दिले होते. परंतु अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे हा रस्ता एक वर्षभरामध्येच खराब झाला. आजची परिस्थिती जर पाहिली नांदूर घाट ते चौसाळा १६ किलोमीटर आंतर आहे. या अंतरासाठी एक तास पंधरा मिनिटे लागतात या रस्त्यालगत असलेली गावे पालसिंगण. जेबापिंपरी दोन हिंगणी गावे अशी महत्त्वाची चार गावे या रस्त्याला आहेत. गावांमधून व आजूबाजूच्या गावांमधून विद्यार्थी शाळेसाठी चौसाळा किंवा नांदुर घाट येथे येत असतात त्यामुळे त्यांचे खूप मोठे नुकसान या रस्त्यामुळे होते. येणे जाण्यासाठी दोन ते अडीच घंटां या प्रवासामध्ये जातो खरं जर पाहिलं तर या प्रवासाला पंधरा मिनिटांचा रस्ता असताना



एक तास पंधरा मिनिटे लागतात रस्त्यावर अक्षरशा मोठे खड्डे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात उर्वरित काही जागेवरच रस्ता दिसून येतो त्यामुळे प्रवाशांच्या शरीरा संबंधित मणक्याचे किंवा इतर आजार उद्भवलेले पाहायला मिळतात जेयबापिंपरी गावां मधून जाणाऱ्या रस्त्यावर सिमेंट रस्ता देखील २०० ते ३०० मीटरचा केलेला तो देखील दोन महिन्यांमध्येच खराब झाला गुणवत्ता कामामध्ये दिसून न आल्यामुळे नागरिक व प्रवासी खूप दुःखी आहेत. तक्रार कोणाजवळ करायची असा देखील प्रश्न सर्वसामान्य प्रवासी व गावकऱ्यांमध्ये उद्भवलेला आहे. संबंधित विभागाने तात्काळ या रस्त्याची दखल घ्यावी अशी सोशल मीडिया द्वारे देखील तरुणांची मागणी दिसून येते हिंगणी गावचे सरपंच संतोष तांदळे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट टाकून तात्काळ रस्त्याच्या मागणीकडे लक्ष द्या अन्यथा मोठे आंदोलन करण्याचा देखील इशारा त्यांनी सोशल मीडियावरील पोस्ट मधून दिला आहे. पालसिंगण येथील युवा कार्यकर्ते अशोक जगताप यांनी देखील या रस्त्या संबंधित संबंधित प्रशासनाला पाठीमागच्या काही काळामध्ये जाब विचारला होता. परंतु त्याची दखल प्रशासनाने अद्यापही घेतलेली नाही. त्यामुळे तात्काळ या रस्त्याची दखल घेऊन रस्ता उत्कृष्ट दर्जाचा करून देण्याची मागणी या पंचक्रोशीतील नागरिकांनी व प्रवाशांनी केली आहे.

> हा रस्ता आमच्यासाठी खूप महत्त्वाचा असून आठवडी बाजार नांदूर घाट येथे असून दैनंदिन व्यवहार चौसाळा येथे आहेत त्यामुळे आमच्या गावकऱ्यांची या रस्त्यावरून प्रवास करत असताना खूप कसरत होत आहे. संबंधित विषयाचे निवेदन देखील दिले परंतु प्रशासनाने दखल घेतली नाही तात्काळ रस्ता करून द्यावा.
>
> अशोक जगताप

# युनिक क्यूरियस किड्समध्ये आगळी वेगळी दहीहंडी

परळी । प्रतिनिधी

'युनिक क्यूरियस किड्स' मध्ये यंदा जन्माष्टमी निमित्त साजरी झालेली दहीहंडी एक वेगळाच संदेश देऊन गेली. पारंपरिक गोड पदार्थ, चॉकलेट्स किंवा खेळणी यसोबतच, हंडीत भरले होते शालेय वस्तू पेन्सिली, पेन, खोडरबर, रंगीत पेन्सिली आणि इतर शैक्षणिक साहित्य.

लहान गोविंदा आणि गोपाळांनी कृष्णवेश परिधान करून, गाण्यांच्या तालावर, उत्साहाने मानवी पिरॅमिड रचला. वरच्या छोट्या गोविंदाने हंडी फोडताच शालेय वस्तूंचा वर्षाव झाला. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि आश्चर्याची लहर उमटली.हा आगळावेगळा उपक्रम केवळ उत्सवाचा आनंद देणारा नव्हता, तर विद्यार्थ्यांना त्यांच्या नवीन अभ्यासक्रमासाठी प्रोत्साहन देणारा ठरला.



शिक्षणाची गोडी लावणारी आणि सांस्कृतिक परंपरांचे महत्त्व सांगणारी ही दहीहंडी पालक आणि उपस्थित पाहुण्यांनीही कौतुकाने गौरवली. प्रत्येक वयोगटातील विद्यार्थ्यांनी कृष्ण जन्माची वेगवेगळ्या नाटिका ही सादर केल्या.

# विद्यार्थिनींचे कॅन्सररोग प्रतिबंधक व्हॅक्सिनेशन मोफत करणार- डॉ.शेटे

## देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त वसंत हंकारे यांचे वडवणीत व्याख्यान

वडवणी । प्रतिनिधी

देवदूत प्रतिष्ठान वडवणी च्या वतीने डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब अध्यक्ष आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समिती यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १६/०८/२०२५ शनिवार रोजी सकाळी ११:०० वाजता राम मंदिर चौक वडवणी येथे, महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध व्याख्याते तथा प्रबोधनकार डॉ.वसंत हंकारे सर यांचा चला जगूया आनंदाने सुखी जीवनाचा मुलं मंत्र शिकवणारे ,न समजलेले आई बाप विषयावर व्याख्यान संपन्न झाले.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ.ओमप्रकाशजी शेटे साहेब आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य समितीचे अध्यक्ष व त्यांच्या अर्धांगिनी सौ.शिल्पाताई शेटे,कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके,मा.आ.केशवराव आंधळे,युवा नेते भारतजी जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, गटशिक्षण अधिकारी बी.वाय.उजगरे,काँग्रेस पार्टीचे नेते दादासाहेब मुंडे,शिवसेना नेते श्री.विनायक बप्पा मुळे,आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त श्री.राज पाटील,वडवणी कृ.उ.बा.स. उपसभापती अनिलदादा चोले,श्री.बंडूजी खांडेकर देवदूत प्रतिष्ठान अध्यक्ष अदीमान्यवर म्हणून उपस्थित होते.

माजी आमदार केशवराव आंधळे यांनी डॉ.ओमप्रकाशजी शेटे यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून त्यांना शुभेच्छा दिल्या त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.ओमप्रकाशजी पान ३ वर



# बैलपोळ्याच्या सणानिमित्ताने फुलला युसूफवडगावचा आठवडी बाजार

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील आठवडी बाजार बैलपोळयाच्या सणानिमित्ताने फुलला असुन शेतकऱ्यांनी पोळा साहित्य खरेदीसाठी गर्दी केलेली होती.

भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाला विशिष्ठ असे महत्व आहे.आणि श्रावण महिना तर सणांचा महिना आहे म्हणुन याला विशेष असे महत्व आहे आणि या महिन्याची सांगता अमावस्येला अर्थात बैलपोळा सणाने पान ३ वर



आष्टी : शहरात नव्याने सुरू असलेल्या श्री स्वामी समर्थ ट्रॅक्टर्स सेल सर्विस स्पेअर्स या भव्य ट्रॅक्टर शोरूमचे उद्घाटन महंत श्री स्वामी महादेव आनंद भारती महाराज यांच्या शुभहस्ते संपन्न झाले यावेळी बीडचे माजी आमदार सुनील दादा धांडे तसेच या शोरूमचे प्रोप्रायटर संजय दादा टेकाडे, राजकुमार टेकाडे डे प्रा दीपक शेठ टेकाडे संजय सोले सर, अनिल जगतापआधी सह नागरिक उपस्थित होते. छाया शरद रेडेकर

# सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी मिरवणूक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशतोकोतर सुवर्ण महोत्सवी.. ७२५ व्या जयंती निमित्त माऊलींची पालखी मिरवणूक आणि वारकरी सांप्रदायिक दिंडीचे आयोजन करण्यात आले होते..

या शोभायात्रा आणि दिंडीमुळे आष्टी शहर भक्तिमय झाल्याचे दिसून येत होते.या शोभायात्रेत आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस व नगरपंचायत चे मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे यांनी सहभाग झाले होते.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून.. कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७२५ व्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त राज्यभरातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां,नगरपंचायत, नगरपरिषद, या ठिकाणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीची मिरवणूक आणि वारकरी संप्रदायाच्या जयघोषात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर आष्टी नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये भाविकांच्या उत्साहात आणि भक्तिभावाने माऊलींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत टाळकरी, वारकरी संप्रदायातील मंडळी तसेच नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ''ज्ञानोबा माऊली'' आणि ''माऊली माऊली''च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला.. यावेळी हरिभक्त परायण अशोक भोसले महाराज यांच्या श्री संत नामदेव महाराज गुरुकुल पारगाव जोगेश्वरी येथील ३५ विद्यार्थ्यांनी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभाग नोंदवला आष्टी शहरातील श्री दत्त मंदिर येथून या पालखी सोहळ्यातील सुरुवात करण्यात आली आणि ही शोभायात्रा दत्त मंदिर गल्ली कसबा पेठ कुंभार गल्ली जैन मंदिर कमान वेस मार्गे मुख्य बाजारपेठ शनी मंदिर चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये या शोभा यात्रेची सांगता झाली.

# कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयात दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ०८.०५ वाजता सभापती जयदत्त आण्णा नरवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या बाजार समितीने हर घर तिरंगा मोहिमे अंतर्गत दि.१३ ऑगस्ट रोजी सचिव हरिभाउ सवणे यांच्या हस्ते व दि. १४ ऑगस्ट रोजी उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांच्या हस्ते तर दि. १५ ऑगस्ट शुक्रवार रोजी



स्वातंत्र्यदिनी सभापती जयदत्त आण्णा पान ३ वर

# बदामराव पंडितांचा बंगला कार्यकर्त्यांनी फुलला

गेवराई । प्रतिनिधी

स्पष्टवक्तेपणा आणि मनमिळाऊ स्वभाव आणि सकारात्मक दृष्टिकोन युवकांना आपला मित्र वाटणारे युवा नेते यशराज पंडित यांचा दिनांक १६ ऑगस्ट रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वाढदिवसानिमित्त माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा बंगला युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले.



कमी वयात तरुण मित्रांची मोठी फळी आणि तीही जीवाला जीव देणारी निर्माण करण्याचे काम यशराज पंडित यांनी तालुकाभरात केले आहे. प्रत्येकाच्या अडीअडचणीला धावून जाणारा आणि वेळप्रसंगी स्वतःचाही जीव धोक्यात घालणारा जीवाभावाचा मित्र म्हणून यशराज पंडित यांच्याकडे गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावचा युवक पाहतो. वडील बदामराव पंडित यांच्याप्रमाणेच स्वभावगुण असलेले यशराज पंडित हे गेवराई तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागातल्या प्रत्येक कुटुंबाच्या सुखदुःखाच्या प्रसंगी आवर्जून उपस्थित राहून आपलेपणाने राहतात. त्यामुळे त्यांच्याविषयी गाव, वाडी, वस्ती, तांड्यावरील लोकांमध्ये मोठा विश्वास निर्माण झालेला आहे. १६ ऑगस्ट रोजी यशराज पंडित यांचा वाढदिवस असल्याने दिवसभर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी ग्रामीण भागातून आपापल्या गाड्यांमधून येत तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित झाला होता. प्रत्येकानेच आपल्या लाडक्या युवा नेत्याचे शाल, श्रीफळ व फेटे बांधून सत्कार करत केक व पेढा भरून त्यांचे तोंड गोड केले. यावेळी बोलताना यशराज पंडित म्हणाले की, सर्व मित्र परिवाराला एकत्र आणण्यासाठी माझा वाढदिवस हे एक कारण आहे. परंतु माझ्या सर्व मित्रांना एकत्रित पाहण्याचा योग आणि बोलण्याची संधी मला या वाढदिवसानिमित्त मिळाली.

# दिंद्रुड येथे दहीहंडीचा रोमहर्षक सोहळा थरार पाहण्यासाठी बाजारतळावर गर्दी

दिंद्रुड । प्रतिनिधी

**मुंबईसह संपूर्ण राज्यभरात दहीहंडीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. शहरातील हे लोन आता ग्रामीण भागातही पोहोचले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिंद्रुड येथे दहीहंडीचा थरार पाहायला मिळाला. चार मानवी मनोरे रचत गोविंदाने दहीहंडी फोडली. येथील बाजार तळावर असलेल्या वटवृक्षाखाली बांधण्यात आलेली दहीहंडी प्रेक्षकांचे आकर्षण ठरली होती. दहीहंडीचा रोमहर्षक सोहळा अनुभवण्यासाठी अबाल वृद्धांनी मोठी गर्दी केली होती.**

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड हे गाव सांस्कृतिक व धार्मिक कार्यात नेहमीच अग्रेसर असते. मागील पंचवीस वर्षांपासून श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने येथील सर्व जाती धर्मातील युवकांच्या पुढाकाराने दहीहंडी बांधण्यात येते.शिवभक्त गणेश मंडळ,एकता



गणेश मंडळ व अक्षय चांदबोधले मित्र मंडळाच्या साठ गोविंदांनी यावर्षीही बोल बजरंग बली की जय, गोविंदा आला रे आला आदी गाण्यांच्या तालावर मोठ्या उत्साहाने दहीहंडीच्या उत्सवात सहभागी झाली होती. गुलालाची उधळण करत बाळ गोपाळ सुद्धा या उत्सवात आनंदाने सामील झाले होते. माजी सरपंच अजय कोमटवार, पत्रकार संतोष स्वामी, अमोल ठोंबरे, गणेश काटकर यांच्या हस्ते श्रीकृष्ण प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ वाढवून दहीहंडीच्या उत्सवास प्रारंभ करण्यात आला. बळीराजाला सुगीचे दिवस यावेत, गावात शांतता नांदावी यासाठी उपस्थितांनी भगवान श्रीकृष्णाकडे प्रार्थना केली. यावेळी शेकडो गावकरी उपस्थित होते. अक्षय चांदबोधले मित्र पान ३ वर

# फॅशन शोमध्ये शौर्यची कामगिरी

## बीडमध्ये तुलसी समूहाकडून चॅम्प ऑन रॅम्प स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्या वतीने रविवारी (दि.१७ ऑगस्ट) चॅम्प ऑन रॅम्प या राज्यस्तरीय लहान मुलांच्या फॅशन शोचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधून लहानग्या स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला. रॅम्पवरच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून प्रत्येकाने आपले कौशल्य दाखवले.



याच स्पर्धेत तुलसी इंग्लिश स्कूलचा शौर्य सुनील डोंगरे या लहानग्या स्पर्धकाने ३ ते ६ वयोगटात थेट टॉप-५ मध्ये स्थान मिळवत राज्य पातळीवर बीडचा झेंडा फडकावला. शौर्यच्या या यशामुळे त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

तुलसी एज्युकेशनचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून चॅम्प ऑन रॅम्प सिजन एक ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.यावेळी आयकर विभागाच्या उपआयुक्त श्रीमती नितीका विलास, ''चला हवा येऊ पान ३ वर

# श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग पिंपळवंडी येथे आज चौथा श्रावणी सोमवार यात्रा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील स्वयंभू शिव महादेव पार्वतीचे श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान हे पंचक्रोशीतील व बीड जिल्ह्यातील सर्वात पुरातन देवस्थान आहे.ज्या गंगाभारती महाराजांनी या शिवमंदिराचा जिर्णोद्धार केला त्यांच्यापासून आजपर्यंत येथे १३ पिढ्या झालेल्या आहेत.हे संस्थान एकांताचे असून अनेक दैवी चमत्कार या ठिकाणी घडलेले आहेत.अशी आख्यायिका असून



मानसिक समाधानाचे हे अतीउच्च शिखर आहे. ही साधनेची श्रेष्ठ भूमी आहे.त्यागी जीवनाची शिकवण देणारे हे तीर्थ ठिकाण,भक्ती प्रेमाचे माहेर व निसर्गाशी आणि प्राणीमात्राशी मैत्री जोडणारे हे संत पीठ आहे.अशा या श्री क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर ठिकाणी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी चौथ्या श्रावणी सोमवार प्रित्यर्थ भक्तीमय वातावरणात आज दि.१८/०८/२०२५ सोमवार रोजी यात्रा उत्सव संपन्न होत आहे. दरवर्षीप्रमाणे मंदिरात मठाधिपती महंत गुरुवर्य स्वामी ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनात व वारकऱ्यांच्या उपस्थितीत दि.११ ते दि.१८/०८/२०२५ दरम्यान अखंड विनावादन सप्ताह सोहळा सुरू होऊन त्या सप्ताह सोहळा व यात्रा उत्सवाची सांगता ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने व महाप्रसादाने आज होणार आहे.या निमित्त पिंपळवंडी गावातून मंदिरापर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात येते.या मंदिरात प्रत्येक सोमवारी व श्रावण महिन्यात दर्शनासाठी परिसरातील व अन्य ठिकाणचे भाविक येऊन दर्शनाचा लाभ घेतात.श्रावण महिन्यात या ठिकाणी नित्याचे धार्मिक कार्यक्रमाची मांदयाळी असते.बीड-अहिल्यानगर- मुंबई या राज्य महामार्गावर बीड पासून ५० किमी व अहिल्यानगरपासून ८० किमी अंतरावर असलेल्या पिंपळवंडी गावापासून काही अंतरावर निसर्गरम्य परिसरात वटवृक्षाच्या छायेत नवीन जीर्णोद्धार केलेल्या आकर्षक श्री क्षेत्र अश्वत्थलिंग मंदिरासह श्री.गंगाभारती, श्री.ईश्वर भारती महाराज साधुसंतांचा मठ परिसर आहे.प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री.क्षेत्र स्थळी भगवान शंकराने अश्वरूपात वास्तव केल्याची पौराणिक अख्यायिका पान ३ वर

# ग्रामरोजगार सेवकाचा मुजोरपणा

## महिला सरपंचाला अश्लील भाषेत शिवीगाळ

**आष्टी म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील अरणविहरा गावातील काही ग्रामस्था सोबत बोलणे सुरू असताना याच दरम्यान बिनबुडाचे आरोप करत अपशब्द वापरून महिला सरपंचाला अश्लील भाषेत शिवीगाळ करण्याचा मुजोरपणा येथील ग्रामरोजगार सेवकाने केला असल्याने याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.**

तालुक्यातील अरणविहरा येथील प्रकार ग्रामपंचायत असून येथे लोकनियुक्त महिला सरपंच यांचे पती १३ ऑगस्ट रोजी ग्रामस्थासोबत गावातील काही विकासकामा बद्दल चर्चा करत असताना याचवेळी गावातीलच राजू रघुनाथ रामगुडे या ग्रामरोजगार सेवकाने ग्रामरोजगार सेवकाचा मुजोरपणा करत महिला सरपंच यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तर दुसऱ्या व्यक्तीने सरपंचपती यांना सरपंच नालायक आहे. आम्ही बोलणार आमच कार्य आहे. आमचं काय वाकड करायचे ते करा असे उध्धटपणाचे शब्द देखील सुनावले. महिला सरपंचांच्या चारित्र्याचा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. सदरील मुजोर ग्रामरोजगार सेवकावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार सरपंच पती यांनी याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. दरम्यान, महिला सरपंच गावात उपस्थितीत नसताना त्याना सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करून शिवीगाळ करणे योग्य नाही, अश्या आडमुठ्या व मुजोरपणा करणाऱ्या ग्रामरोजगार सेवकावर कठोरातील कठोर कारवाई व्हावी अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

आरणविरहा तागडखेल ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच त्यांचे पती आण्णा शिरसाठ यांनी येत्या दोन दिवसांत जर त्या रामगुडे कर्मचाऱ्यांला निलंबित नाही केले तर सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांसोबत आम्ही तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसु असे आमच्या प्रतिनिधी बोलताना ठणकावून सांगितले.

# भैरवनाथ विद्यालय अरणविहिरा येथे १५ ऑगस्ट रोजी गणतंत्र उत्सवानिमित्त शालेय साहित्य वाटप



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अरणविहिरा येथे असणारे भैरवनाथ विद्यालय या शाळेत एन. व्हीडिया व हरे कृष्णा फाउंडेशन पुणे तसेच धनश्री बिगर शेती पतसंस्था आष्टी यांच्यामार्फत विद्यालयातील पाचवी ते दहावी वर्गात शिकत असलेल्या सर्व मुलींना शाळेचे दप्तर देण्यात आले तसेच हरे कृष्णा फाउंडेशन पुणे मार्फत शाळेला पुस्तक रेनकोट दिले त्याचप्रमाणे, विद्यालयातील माजी विद्यार्थी प्रवीण तांदळे यांनी मुलांना जेवण दिले.तसेच आई-वडील नसलेल्या मुलांना शाळेचे कपडे व शाळेला सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा संच दिला या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष तांदळे साहेब आजिनाथ शिरसाट कॉम्प्युटर इंजिनियर प्राजक्ता शिरसाट कॉम्प्युटर इंजिनिअर त्याचबरोबर अंभोरा पोलिस स्टेशनचे अधिकारी शिरसाठ साहेब व साहेब माने साहेब यांनी अमली पदार्थ जनजागृती यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आणि गावातील ग्रामस्थ उपस्थित होते या सर्वांचे शाळेच्या वतीने खूप खूप आभार.


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘वसंतदादांचे सरकार मीच पाडलं’; शरद पवारांनी उलगडला जुन्या राजकारणाचा अध्याय

**पुणे । प्रतिनिधी**


**राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात एका कार्यक्रमात खळबळजनक कबुली दिली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना पवारांनी १९७८ च्या काळातील राजकारणाचा आणि आजच्या बदललेल्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला.**

शरद पवारांनी पहिल्यांदाच जाहीरपणे सांगितले की, १९७८ मध्ये वसंतदादा पाटील यांचे सरकार आम्हीच घालवले. तसेच वसंतदादांच्या मोठ्या मनाच्या नेतृत्वाचाही गौरव शरद पवारांनी केला.

शरद पवार म्हणाले, वसंतदादा हे इंदिरा काँग्रेसमध्ये होते, तर आम्ही यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे स्वर्णसिंह काँग्रेसमध्ये होतो. निवडणुकीनंतर दोन्ही काँग्रेस एकत्र येऊन सत्ता स्थापनेचा प्रयत्न करत होत्या, पण आम्हा तरुणांना याचा विरोध होता.

त्यामुळे आम्ही ठरवलं की वसंतदादांचे सरकार घालवायचे. आम्ही ते पाडलं आणि मी मुख्यमंत्री झालो. १९७८ मध्ये पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) स्थापन करून वसंतदादांचे सरकार पाडण्यात पवारांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती, त्यामुळे त्यांच्यावर ‘वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसला’ असा आरोपही झाला होता.

पवारांनी पुढे सांगितले की, दहा वर्षांनंतर परिस्थिती बदलली. काँग्रेस पुन्हा एकत्र आली तेव्हा वसंतदादांनी भूतकाळ विसरून पवारांना मुख्यमंत्रिपदासाठी पाठिंबा दिला. मुख्यमंत्री कोणाला करायचे, यावर चर्चा सुरू होती. अनेक नावे पुढे आली, पण वसंतदादांनी ठामपणे



सांगितले की, पक्ष सावरण्यासाठी शरद पवारांकडेच नेतृत्व द्यायला हवे. ज्या व्यक्तीचे सरकार मी पाडले, त्यांनीच गांधी-नेहरूंचे विचार पुढे नेण्यासाठी मला पाठिंबा दिला. हे मोठ्या मनाचे नेतृत्व त्या काळात काँग्रेसमध्ये होते, असे पवारांनी नमूद केले.

शरद पवारांनी आजच्या राजकारणावरही भाष्य केले. ते म्हणाले, पूर्वी राजकारण मोठ्या मनाने केले जायचे. आता मात्र राज्यकर्त्यांकडूनच संसदेचे कामकाज ठप्प केले जाते. १४ दिवसांचे अधिवेशन चालू आहे, पण सातत्याने सभागृह तहकूब होते. हे संसदीय लोकशाहीला शोभत नाही. त्यांनी दिल्लीत ३०० खासदारांनी एकत्र येऊन शांततापूर्ण आंदोलन केल्याचा उल्लेख केला. सत्ताधारी पक्ष महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असेल, तर आम्ही एकत्र येऊन आवाज उठवू. लोकशाही आणि संसदीय पद्धती टिकवण्यासाठी हे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. पवारांनी पंतप्रधानांच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणावरही टीका केली. लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांनी देशाला दृष्टी देण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी जवाहरलाल नेहरूंचे नाव घेतले नाही. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी आयुष्य वेचले, देश एकसंध ठेवला आणि भारताची जागतिक महती वाढवली, त्यांचे नाव न घेणे अस्वस्थ करणारे आहे, असे पवार म्हणाले. त्यांनी गांधी-नेहरूंच्या विचारांना पुन्हा एकदा देशापुढे मांडण्याची आणि देशाचा चेहरा बदलण्याची गरज असल्याचे ठासून सांगितले.

## महाराष्ट्राच्या नेतृत्वाची ताकद

वसंतदादा पाटील आणि यशवंतराव चव्हाण या नेत्यांनी महाराष्ट्रात नेतृत्वाची फळी उभी केली. त्यामुळे महाराष्ट्र देशातील अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले गेले. त्यांनी दाखवलेली दृष्टी आणि ताकद यामुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला. आज देशातील चित्र बदलले आहे. सत्तेचा गैरवापर आणि संसदेचे कामकाज ठप्प करणे हे लोकशाहीला धक्का देणारे आहे. आम्ही सर्वांनी एकत्र येऊन गांधी-नेहरूंच्या विचारांवर आधारित देशाचा चेहरा पुन्हा घडवण्याची जबाबदारी घेतली पाहिजे, असं आवाहन शरद पवार यांनी केले.

# शिरूरच्या अष्टविनायक महामार्गावर भीषण अपघात; वाजे कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**शिरूर । प्रतिनिधी**

**तालुक्यातील अष्टविनायक महामार्गावरील काळूबाई नगर परिसरात बंटी ढाब्याजवळ रविवारी (दि. १७) पहाटे झालेल्या भीषण अपघातात वडनेर (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथील वाजे कुटुंबातील तिघांचा करुण अंत झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.**



मृतांमध्ये ज्ञानेश्वर मकाजी वाजे (वय ३८), त्यांच्या आई शांताबाई मकाजी वाजे (वय ६८) आणि मुलगा युवांश ज्ञानेश्वर वाजे (वय ५) यांचा समावेश आहे. ज्ञानेश्वर हे आपल्या आई आणि मुलासह मुंबईहून दूध वाहतूक करणाऱ्या टँकरने (क्र. एमएच १६ सीडी ९८१९) गावाकडे परतत होते. कवठे येमाई येथील बंटी हॉटेलजवळ त्यांचा टँकर मालवाहू ट्रकवर (क्र. एमएच ४२ बी ८८६६) जोरदार धडकला.

धडक इतकी भीषण होती की, टँकर ट्रकमध्ये घुसला. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले. मात्र, युवांशचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी असलेल्या शांताबाई आणि ज्ञानेश्वर यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. टँकरचा चालक जखमी असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या अपघाताने वडनेर गाव आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. टाकळी हाजी पोलीस दुरक्षेत्राचे उपनिरीक्षक दिलीप पवार यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. अष्टविनायक महामार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे हा रस्ता ‘मृत्यूचा सापळा’ बनला आहे. धोकादायक वळणांवर चेतावणी फलक आणि शास्त्रीय गतिरोधक उभारण्याची मागणी स्थानिकांनी पुन्हा एकदा लावून धरली आहे.

# पुणे जिल्ह्यात ड्रोन कॅमेऱ्याच्या वापरासाठी परवानगी बंधनकारक!

**पुणे । प्रतिनिधी**

**आजकाल मोठ्या कार्यक्रमांमध्ये आकाशात ड्रोन उडवून त्याद्वारे चित्रीकरण केले जाते. पण आता याबाबात एक**



**मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यात कोणत्याही खाजगी कार्यक्रमात ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करताना त्याबाबत माहिती देऊन परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आलं आहे. याबाबतचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी काढले आहेत.**

या आदेशनुसार पुणे जिल्ह्यात कोणत्याही खासगी व्यक्ती, कार्यक्रम व्यवस्थापन (इव्हेंट मॅनेजमेंट) व छायाचित्रण करणाऱ्या व्यावसायिकांनी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करताना त्याची पूर्व माहिती सात दिवस अगोदर संबंधित पोलीस ठाण्यात देऊन परवानगी घ्यावी लागणार आहे.

पुणे जिल्ह्यात अनेक महत्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था असून दहशतवादी कारवायांमध्ये ड्रोन कॅमेऱ्याद्वारे टेहळणी होऊन त्याचा अतिरेकी कारवायांमध्ये उपयोग केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच दौंड, बारामती शिरूर तालुक्यात रात्रीच्या वेळी ड्रोन फिरत असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. हे प्रतिबंधात्मक आदेश पुढील दोन महिन्यांसाठी लागू राहतील, असं सांगण्यात आलं आहे.

# बालगोपाळांनी लुटला अभिनव ‘सायकल दहीहंडी’चा आनंद



पुणे । प्रतिनिधी

ढोलताशाच्या गजरात बालगोपाळांनी अभिनव अशी सायकल दहीहंडी फोडली. जेधे सोशल वेलफेअर फाऊंडेशन व इंद्राणी बालन फाऊंडेशनतर्फे श्री शिवछत्रपती मित्र मंडळाने शुक्रवार पेठेतील जेधे मॅन्शन, पंचमुखी मारुती मंदिर येथे सायकल दहीहंडीचे आयोजन केले होते.सायकल दहीहंडीतील २०० सायकलींचे मोफत वाटप भोर, राजगड, मुळशी तालुक्यातील रायरी, सोंडे माथाना, कोंदवाडी, मेटपिलावरे, पाली बुद्रुक, वाजेघर बुद्रुक, लव्ही बुद्रुक, खेचरे, कळमशेत, बेलावडे, मांदेडे आणि बावीसमैल या अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना, तसेच शहरातील मध्यवर्ती भागातील गरजू विद्यार्थ्यांना करण्यात आले.

यावेळी सायकलींच्या मधोमध क्रेनला बांधलेली दहीहंडी सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती. मृत्युंजय वाद्यपथक, गणेशा वाद्यपथकाने बहारदार ढोलवादन केले.यावेळी उद्योजक पुनीत बालन, पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, सहायक पोलीस आयुक्त साईनाथ ठोंबरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण, माजी नगरसेवक अविनाश बागवे, संयोजक कान्होजी दयानंद जेधे, गौरव बोराडे, मंडळाचे कार्यकर्ते बलराज वाडेकर, साहिल भिंगे, साईराज नाईक, प्रीतम परदेशी, उमेश सपकाळ, मंगेश कोंढरे, राजवीर जेधे आदी उपस्थित होते.

पुनीत बालन म्हणाले, आजवर इंद्राणी बालन फाऊंडेशनतर्फे पुणे, सातारा व अन्य जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास आणि क्रीडा क्षेत्राशी निगडित ज्ञान मिळण्यास वेळ मिळावा, हा यामागचा उद्देश आहे. यंदा या अभिनव सायकल दहीहंडीच्या माध्यमातून २०० सायकलींचे वाटप करताना आनंद होत आहे.

# थोर महापुरुषांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सजवला स्वातंत्र्य सोहळा

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे जिल्ह्यातील स्वातंत्र्य पूर्व काळापासून वाल्हे (ता.पुरंदर) हे गाव चळवळीचे केंद्र, गांधीवादी, समाजवादी,पुरोगामी विचारांची परंपरा या गावात आजपर्यंतही सुस्थितीत आहे.वाल्हे गावाने स्वातंत्र्य चळवळीला अनेक स्वातंत्र्य सैनिक दिली आहेत.यामुळे येथे स्वातंत्र्यदिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात येतो.यावेळी,वाल्हे बाजारपेठमधील गांधी चौकात सरपंच अतुल गायकवाड यांच्या हास्ते ध्वजारोहण करण्यात आले.**




यावेळी,देशभक्तीपर गीते प्रसन्न वातावरण आणि ‘भारतमाता की जय’, ‘वंदेमातरम’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.यावेळी सजावटीसाठी केलेली तिरंगी फुग्यांची आरास गावकऱ्यांचे लक्षवेधी होती.दरम्यान,विविध वेशभुषा केलेल्या शालेय विद्यार्थ्यांनी,ढोल-ताशांच्या गजरात मुख्य बाजारपेठेमधुन, प्रभात फेरी काढण्यात आली.यावेळी,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांची हुबेहुब वेशभूषा परिधान करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले होते.दरम्यान,महर्षी वाल्मिकी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते,वेशभुषा,नाटिका सादरीकरण करण्यात आले.यावेळी,भाजप ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सचिन लंबाते,माजी सरपंच अमोल खवले, प्राचार्य सतिश निगडे,उपसरपंच सम्राज्ञी लंबाते,गिरीष पवार,बाळासाहेब भुजबळ,सतीश पवार,त्रिंबक भुजबळ,दादासाहेब राऊत,दिपक कुमठेकर,ग्रामविकास अधिकारी अनिल हिरासकर,माजी उपसरपंच अमित पवार,ग्रामपंचायत सदस्य सागर भुजबळ,हरिष दुबळे,अमोल पवार,तेजस दुर्गाडे,पुर्वा राऊत,कविता पवार,प्रमिला पवार,मयुरी भुजबळ,शितल मदने आदींसह,ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येत उपस्थित होते. दरम्यान,वाल्हे,राख, नावळी, जेऊर, पिसुर्टी,मांडकी, दौंडज, हरणी, पिंगोरी, सुकलवाडी, आडाचीवाडी, वागदरवाडी आदी गावात स्वातंत्र्यदिन विविध उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# भिमाशंकर-शिवनेरी-नाणेघाट विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरणाची मागणी

जुन्नर । प्रतिनिधी

भिमाशंकर ज्योतिर्लिंग तिर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांची नियुक्ती केली आहे. या निर्णयाचे स्वागत करत सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भिमाशंकरसह शिवनेरी आणि नाणेघाट परिसराच्या समग्र पर्यटन विकासासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी केली आहे.



शिवनेरी किल्ला अलीकडेच युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांमध्ये समाविष्ट झाला आहे. भिमाशंकरच्या रांगेतील निसर्गसंपन्नता, ऐतिहासिक वारसा आणि धार्मिक महत्त्व लक्षात घेता, या परिसराचे नियोजनबद्ध संवर्धन आवश्यक आहे, असे सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेचे अध्यक्ष राहुल जोशी यांनी सांगितले. यासाठी भिमाशंकर - शिवनेरी - नाणेघाट संवर्धन प्राधिकरण स्थापन करून या कामाची जबाबदारी व्ही. राधा यांच्याकडे सोपवावी, असे त्यांनी सुचवले.

पर्यटन सचिव अतुल पाटणे यांच्याकडे या मागणीचा प्रस्ताव अभिप्रायासाठी पाठवण्यात आल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे जुन्नर तालुक्याच्या पर्यटन विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार केला जात असून, त्याला प्राधिकरणाचे स्वरूप देण्याची आवश्यकता असल्याचेही जोशी यांनी स्पष्ट केले.

बारा किल्ल्यांच्या शिवतीर्थ यात्रेची मागणी..

सह्याद्री संस्थेने युनेस्को मान्यताप्राप्त बारा किल्ल्यांची शिवतीर्थ यात्रा सुरू करण्याची मागणी केली असून, जुन्नरमधील नव्याने बांधले जाणारे बसस्थानक हे वारसास्थळात घ्यावे. यासाठी मुख्यमंत्र्यां बरोबरच परिवहन मंत्री व एसटी महामंडळाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. या दोन्ही मागण्यांवर संस्थेचा ठाम आग्रह असल्याचेही जोशी यांनी स्पष्ट केले.

# बिनविरोध नगरसेवक रविभाऊ लांडगे यांचा अभिष्टचिंतन सोहळा भोसरी येथे उत्साहात





**पुणे पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

भोसरीतील सेक्टर १ इंद्रायणी नगर भोसरी येथे पिंपरी चिंचवड शहराचे एक युवा नेते बिनविरोध नगरसेवक माननीय रविभाऊ लांडगे यांच्या अभिष्टचिंतन सोहळयास राजकीय सामाजिक शैक्षणिक अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवली यात विशेषतः मोशी, चरोली, दिघी, चिखली, नेहरूनगर, शाहूनगर, भोसरी परिसरातील आजी माझी नगरसेवक सामाजिक कार्यकर्ते हितचिंतक यांनी उपस्थिती दर्शवून पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या कर्नाटक राज्यातील विधान परिषदेचे आमदार माननीय मारुती रावजी मुळे यांनी पण शुभेच्छा दिल्या, १० ऑगस्ट ते १८ऑगस्ट या कालखंडामध्ये गोशाळेमध्ये चारा वाटप, अनाथ मुलांना अन्नदान वाटप, शालेय साहित्य वाटप, कराटे स्पर्धा, महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा क्रांती नाना मळेगावकर यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता हजारोंच्या संख्येने महिलांनी या कार्यक्रमात सहभाग दर्शवला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा नेते राहुल लांडगे, युवा नेते प्रकाश लांडगे, प्रवीण लांडगे रवींद्र नाना लांडगे, अमित जी लांडगे, आनंद ग्रुप उद्योग समूह, कै. अंकुशराय लांडगे प्रतिष्ठान, रवी भाऊ लांडगे मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले.

# दारूच्या वादातून मित्राचा खून

शिरूर । प्रतिनिधी

वडगावरासाई (ता. शिरूर) येथे १६ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा दारू पिण्याच्या किरकोळ वादातून एका तरुणाचा खून झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणाने परिसरात खळबळ उडाली असून, गावात शोककळा पसरली आहे.

फिर्यादी वंदना अविनाश जावीर (वय ३५, शेतमजुरी, रा. मराठी शाळेच्या मागे, वडगावरासाई) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे पती अविनाश उर्फ विशाल जयवंत जावीर (वय ३०) वेल्डिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. १६ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास अविनाश यांचा मित्र विशाल कारभारी उदमले याने त्यांना घराबाहेर बोलावले. त्यानंतर रात्री ११:३० च्या सुमारास अविनाश, विशाल उदमले आणि राहुल दत्ता गंवाडे (रा. वडगावरासाई) हे तिघे सृष्टी हॉटेल बिअरबारसमोर, अंबिका पानटपरीजवळ दारू पित बसले होते. यावेळी दारू पिण्यावरून अविनाश आणि राहुल गंवाडे यांच्यात वाद उफाळला.


हा वाद इतका टोकाला गेला की, राहुल गंवाडे याने अविनाशला हाताने मारहाण केली आणि त्याचे डोके दगडावर आपटले. यामुळे अविनाशच्या नाकातून रक्तस्राव सुरू झाला आणि ते बेशुद्ध पडले. स्थानिकांनी त्यांना तातडीने परभाणे हॉस्पिटलमध्ये दाखल केले, परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.या घटनेनंतर आरोपी राहुल गंवाडे घटनास्थळावरून फरार झाला. सृष्टी हॉटेलचे मालक दिगंबर ढवळे, अंबिका पानटपरीचे मालक मनोज शेलार आणि स्थानिक कामगारांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सापडला नाही. मांडवगणफराटा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, आरोपीचा शोध तीव्र करण्यात आला आहे. पोलिसांनी लवकरच त्याला ताब्यात घेण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. एका किरकोळ कारणावरून मित्रानेच मित्राचा जीव घेतल्याने वडगावरासाई गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# कोणत्याही देशावर बंदी घालणे हा पर्याय नाही, स्वदेशी संशोधनावर भर द्या -माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे

पुणे । प्रतिनिधी

आजच्या जागतिक व्यवस्थेत कोणताही देश स्वयंपूर्ण नाही. संरक्षणसिद्धतेसाठी एखाद्या देशावर सरसकट बंदी घालणे हा उपाय नसून, आपल्याला स्वदेशी संशोधन आणि विकासावर लक्ष केंद्रित करावे लागेल, असे स्पष्ट मत माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी व्यक्त केले. ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत देशात चांगले काम होत असले तरी, गेल्या अनेक वर्षांतील अवलंबित्व कमी करण्यासाठी वेळ लागेल, असेही ते म्हणाले.

ज्ञानप्रबोधिनी शाळेतर्फे आयोजित ‘रुप पालटू या’ व्याख्यानमालेत ’नव्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेसाठी भारताची संरक्षण सिद्धता’ या विषयावरील प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी चीन-पाकिस्तान संबंध, अंतर्गत सुरक्षा आणि लष्करी आधुनिकीकरण यावर सविस्तर भाष्य केले.



चीनसोबतचा वाद हा सीमेपुरता मर्यादित असून, तो राजकीय चर्चेतून सुटेल; मात्र त्यासाठी वेळ लागेल, असे नरवणे म्हणाले. याउलट, पाकिस्तानसोबतचा वाद केवळ सीमेचा नसून तो दोन भिन्न विचारसरणींचा आहे. भारत एक धर्मनिरपेक्ष लोकशाही आहे, तर पाकिस्तान धर्मावर आधारित राष्ट्र असल्याने हा वाद लवकर सुटणे कठीण असल्याचे त्यांनी नमूद केले.अंतर्गत सुरक्षेच्या आव्हानांवर बोलताना ते म्हणाले, देशातील जातीय आणि धार्मिक भेदभावाचा फायदा परकीय शक्ती घेतात. बाह्य सुरक्षेसाठी लष्कर सज्ज आहे, पण अंतर्गत सुरक्षा ही सर्वांची मिळून जबाबदारी आहे. नक्षलवाद आणि ईशान्येतील घुसखोरी नियंत्रणात असली तरी धोका कायम असल्याचे त्यांनी सांगितले. संरक्षण उत्पादनासाठी खासगी क्षेत्राला संधी देणे हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, पण इंजिनासारखे महत्त्वाचे भाग देशातच तयार करण्यावर भर दिला पाहिजे, असे ते म्हणाले. शांतता हवी असेल तर युद्धासाठी सज्ज राहावे लागते, पण युद्ध हा नेहमीच शेवटचा पर्याय असतो, या विचाराने त्यांनी आपल्या मुलाखतीचा समारोप केला.